महाराष्ट्रातील गुन्हेगारीविरुद्ध लढा देणारे एकमेव मराठी वृत्तपत्र...

# महाराष्ट्र क्राईम टाइम्स

MCT वार्ता DIGITAL

प्रकाशन: मुंबई सह एकाच वेळी प्रसारीत ठाणे, पालघर, रत्नागिरी, पुणे, सातारा, कोल्हापूर, सोलापूर, जालना, नाशिक

मूल्य २/- रुपये

Maharashtracrimetimes.com MHCrimeTimes MAHCrimeTimes 9803386748 maharashtracrimetimes@gmail.com

• संपादक: राकेश शंकर गोरे | वर्ष: १५, अंक: १, पृष्ठ: ८ | मुंबई, मंगळवार २ एप्रिल २०२४ ते सोमवार ८ एप्रिल २०२४ • POSTAL REG.NO. MCN/157/2023-2025 • RNI. REG. NO. MAHMAR/2010/33301

## संक्षिप्त

### अंध मतदारांसाठी ब्रेल लिपीत मतदार माहिती चिठ्ठी

■ मुंबई: नितीन देवळेकर

लोकसभा निवडणुकीसाठी अंध मतदारांना आपला मतदानाचा हक्क बजावता यावा यासाठी नॅशनल असोसिएशन फॉर ब्लाइंड इंडिया यांच्या साहाय्याने ब्रेल



लिपीमध्ये मतदार माहिती चिठ्ठी छापण्यात येणार आहे. लोकसभा सार्वत्रिक निवडणूक-२०२४करीता जास्तीत जास्त मतदारांना मतदानाचा हक्क बजावता यावा यासाठी सर्वतोपरी सुविधा उपलब्ध करून देण्यात येत आहेत. या अंतर्गत जिल्ह्यातील जास्तीत जास्त अंध मतदारांना त्यांचा हक्क बजावण्यात सुलभता व्हावी, यासाठी ब्रेल लिपीमध्ये माहिती दस्तऐवज तसेच चिठ्ठी छापण्यात येणार आहे. तसेच यासंदर्भात नॅबचे समन्वय अधिकारीही नेमण्यात येणार आहेत, असे मुख्य निवडणूक अधिकारी कार्यालयामार्फत कळविण्यात आले आहे.

### मतदानाला सुट्टी न देणे महागात पडणार

■ पुणे: गणेश साळवी

राज्यातील लोकसभेच्या ४८ मतदारसंघांसाठी पाच टप्प्यात मतदान होणार आहे. १९ एप्रिल, २६ एप्रिल, ७ मे, १३ मे आणि ५ मे या दिवशी प्रत्यक्ष मतदान होणार आहे. नोकरी, व्यवसाय, रोजगारानिमित्त अनेकांनी



स्थलांतर केले असले, तरी त्यांचे मतदान मूळगावी, दुसऱ्या मतदारसंघात असते. त्यामुळे अनेक मतदारांना कामावरून सुटी दिली जात नाही. याचा परिणाम मतदानाच्या टक्केवारीवर होत असल्याचे दिसून आले आहे. त्यामुळे राज्य शासनाने सर्व आस्थापनांना खासगी, शासकीय संस्था, महामंडळे, उद्योग, व्यावसायिक आणि महामंडळाच्या संस्थांमधील कर्मचाऱ्यांना भरपगारी सुट्टी देण्याचे जाहीर केले आहे. राज्य शासनाच्या उद्योग, उर्जा, कामगार आणि खनिकर्म विभागाचे कार्यासन अधिकारी शामकांत सोनावणे यांनी हे आदेश काढले आहेत. अत्यावश्यक सेवा म्हणजेच रुग्णालये, वैद्यकीय संस्था आस्थापनांमधील कर्मचाऱ्यांना सुटी देणे शक्य नाही. या ठिकाणी जिल्हाधिकारी यांच्याकडून परवानगी घ्यावी. परवानगी देताना स्थानिक मतदारसंघातच ज्यांचे मतदान आहेत त्या मतदारांना मतदानासाठी दोन तासांची सवलत दिली जाईल, याची खात्री करून कार्यवाही करावी, असेही आदेशात नमूद केले आहे. ज्या मतदारांना आस्थापनांकडून मतदानासाठी कायद्यानुसार देण्यात आलेली सवलत दिली जाणार नाही, त्यांनी जिल्हा प्रशासनाकडे तक्रार करण्याचे आवाहन राज्य शासनाकडून करण्यात आले आहे.



# गेल्या १० वर्षात झाले, तो फक्त ट्रेलर

## आरबीआयच्या कार्यक्रमात पंतप्रधान मोदींची मोठी घोषणा

■ मुंबई: यश सावंत

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी जनतेना संबोधित करताना म्हटलं, रिझर्व्ह बँक च्या स्थापना दिनानिमित्त मी RBI च्या सर्व कर्मचाऱ्यांना शुभेच्छा देतो. देशाला नवी दिशा दाखविण्याचे काम आरबीआयने केले आहे. देशाच्या विकासात आरबीआय महत्त्वाची आहे. ग्रामीण अर्थव्यवस्थेला चालना मिळाली, यूपीआयला चालना मिळाली. भारताची बँक व्यवस्था जगातील आघाडीची बँकीग व्यवस्था मानली जातेय. देशाच्या विकासासाठी भारतीय रिझर्व्ह बँक महत्त्वाची आहे, असंही पंतप्रधानांनी म्हटलं आहे.

**आरबीआयच्या कार्यक्रमाला पंतप्रधानांची उपस्थिती**

रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाच्या ९० व्या वर्धापन दिनाच्या कार्यक्रमाला पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी उपस्थिती लावली आहे. यावेळी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, राज्यपाल रमेश बैस, अर्थमंत्री निर्मला सीतारमन, आरबीआय गव्हर्नर शक्तीकांत दास, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार हे उपस्थित होते.

**गेल्या १० वर्षात बँकींग क्षेत्रात मोठ्या सुधारणा**

यावेळी पंतप्रधान मोदींनी यावेळी म्हटलं की, एकेकाळी तोट्यातील अर्थव्यवस्था आज नफ्यात आहे. बँकीग व्यवस्थेतील स्थित्यांतर हा अभ्यासाचा विषय आहे. २०१४ आधी बँकीग व्यवस्था डगमगली होती. गेल्या १० वर्षात बँकींग क्षेत्रात मोठ्या सुधारणा झाल्या आहेत. गेल्या १० वर्षात झाले, तो फक्त ट्रेलर आहे. येत्या काळात आणखी बदल घडवायचे आहेत, असं मोदी म्हणाले.

**पंतप्रधान मोदी काय म्हणाले?**

आज तुम्ही जे धोरण बनवाल काम कराल त्याअनुषंगाने आरबीआयच्या पुढील दशकातील दिशा ठरणार आहे, असं पंतप्रधानांनी सांगितलं. ते पुढे म्हणाले की, आज भारताची बँकिंग सिस्टिमला स्ट्राँग आणि सस्टेनेबल सिस्टिम मानली जाते. जी बँकिंग सिस्टिम डुबणार होती, ती आता नफ्यात आली आहे आणि विक्रम करतेय. मागील १० वर्षात मोठे परिवर्तन आणणे सोपे नव्हते. आमच्या नीतीमध्ये स्पष्टता होती. आज देश पाहतोय, नियत सरळ असते, तेव्हा नीती सरळ असते.

पंतप्रधान मोदी म्हणाले की, पब्लिक सेक्टर सुधारण्यासाठी साडे तीन लाख कोटी रुपये खर्च केले आहेत. २७ हजार पेक्षा जास्त अप्लिकेशन ज्यात डिफॉल्ट होत्या.

(शेष पृष्ठ ६ वर)

## निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर सर्वसामान्यांना मोठा दिलासा! LPG सिलिंडर झाला स्वस्त

■ मुंबई: माधव अलवा

लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर एलपीजी सिलिंडर ग्राहकांना मोठा दिलासा मिळाला आहे. दिल्लीत आजपासून एलपीजी सिलिंडरचे दर ३०.५० रुपयांनी कमी झाले आहेत. एलपीजी सिलिंडर कोलकात्यात ३२ रुपयांनी तर मुंबईत ३१.५० रुपयांनी स्वस्त झाला आहे.



आजपासून सुरू झालेल्या नवीन आर्थिक वर्षाच्या पहिल्या दिवशी एलपीजी सिलिंडर ग्राहकांना मोठा दिलासा मिळाला आहे. दिल्लीत आजपासून एलपीजी सिलिंडरचे दर ३०.५० रुपयांनी कमी झाले आहेत.

(शेष पृष्ठ ६ वर)

## 'मॅचफिक्सिंग'सारखी भाजपने लोकसभा निवडणूक फिक्स केली

■ मुंबई: रघुवीर जाधव

लोकसभा निवडणुकीसाठी पंच पंतप्रधान मोदी यांनी निवडले आहेत. मॅच सुरू होण्यापूर्वीच दोन खेळाडूंना अटक केली आहे. सरकारचा मॅचफिक्सिंगसारखे निवडणूक फिक्स करण्याचा प्रयत्न सुरू आहे. परंतु, मॅचफिक्सिंग जिंकली, तर संविधान हरेल, त्यामुळे तुम्ही मॅचफिक्सिंगला बळी पडू नका, असे आवाहन काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी केले. दिल्लीचे मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांच्या अटकेच्या निषेधार्थ



दिल्लीतील रामलीला मैदानावर इंडिया आघाडीच्या वतीने महारॅली आयोजित केली होती. यावेळी ते बोलत होते. तपास संस्थांचा वापर विरोधकांविरोधात केला जात आहे. जर लोक निवडणुकीत ईव्हीएम नसेल, तर भाजपला १८० जागाही मिळणार नाहीत, असा दावाही गांधी यांनी यावेळी केला. दिल्लीचे मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल,

(शेष पृष्ठ ६ वर)

## छगन भुजबळ पुन्हा अडचणीत? अंजली दमानिया यांच्या पाठपुराव्याला यश

■ मुंबई: सम्यक कासारे

महाराष्ट्र सदन घोटाळा प्रकरणी राज्याचे अन्न व नागरी पुरवठा मंत्री आणि राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते छगन भुजबळांच्या निर्दोष मुक्तता करण्यात आली होती. परंतु, या निर्णयाविरोधात सामाजिक कार्यकर्त्या अंजली दमानिया यांनी मुंबई उच्च न्यायालयात धाव घेतली होती. गेल्या दीड वर्षापासून या प्रकरणाच्या सुनावणीसाठी तारीख मिळत नव्हती. अखेर सर्वोच्च न्यायालयाचे सरन्यायाधीश धनंजय चंद्रचूड यांनी हस्तक्षेप करून या प्रकरणाच्या चौकशीचे आदेश दिले आहेत. त्यानुसार, उद्या याप्रकरणी सुनावणी होणार



आहे. महाराष्ट्रात खळबळ उडवून देणाऱ्या महाराष्ट्र सदन कथित घोटाळा प्रकरणी ९ सप्टेंबरला छगन भुजबळ यांची निर्दोष मुक्तता करण्यात आली होती.

## मनोज जरांगे पाटील अखेर निवडणुकीच्या रणांगणात: विधानसभा लढवणार?

■ मुंबई: सचिन कदम

मनोज जरांगे पाटील यांनी लोकसभा निवडणुकीत अपक्ष उमेदवार न देण्याचा निर्णय घेतला आहे. पण ज्याला पाडायचे त्याला पाडा, असं विधानही मनोज जरांगे पाटील यांनी केलं आहे. त्यामुळे सर्वच राजकीय पक्ष गॅसवर गेले आहेत. एकीकडे मनोज जरांगे पाटील यांच्या इशाऱ्यामुळे लोकसभा निवडणुकीत धाकधूक वाढलेली असतानाच जरांगे यांनी विधानसभा निवडणुकीबाबत मोठं विधान करून सर्वांनाच धक्का दिला आहे. मनोज जरांगे पाटील यांनी थेट राजकारणात येण्याचंच सूतोवाच केलं आहे.



विधानसभेच्या जागा लढवणार असल्याचं जाहीर करतानाच उद्यापासूनच विधानसभेच्या कामाला लागा, असे आदेशच मनोज जरांगे यांनी कार्यकर्त्यांना दिले आहेत. त्यामुळे जरांगे यांच्यामुळे अनेकांची राजकीय खेळी उद्ध्वस्त होण्याची शक्यता निर्माण झाली आहे. मनोज जरांगे पाटील यांनी मीडियाशी संवाद साधताना मोठी घोषणा केली आहे. मराठा समाज आता हुशार झाला आहे आणि लोक म्हणाले म्हणून आता काम करायचे नाही. आम्ही लोकांपर्यंत पोहचू शकत नाही आणि आणि आमच्याकडे ४० उमेदवार उभे करण्याचा डेटा नाही. काहीही करायला लागलो तर जात संपेल,

(शेष पृष्ठ ६ वर)

## शरद पवारांना संपविण्याचे भाजपाचे षडयंत्र? सुप्रिया सुळे यांचा आरोप

■ वाकड/हिंजवडी:: अभिजीत येरल्लू

भाजपाला विकासाचे किंवा जनतेच्या हिताचं काही देण घेणं नाही. भाजपाचे नेते गेल्या काही वर्षापासून बारामतीत बैठका घेत आहेत. त्यांना केवळ शरद पवार यांना संपवायचे आहे. याबाबत त्यांचे नेते बारामतीत पत्रकार परिषदेत चॅनलला मुलाखत देताना बोलले आहेत. असा घणाघाती आरोप सुप्रिया सुळे यांनी ताथवडेत केला.

सुळे यांनी रविवारी (ता. ३१) आयटी नगरी माण येथील मेगा पोलीस व ताथवडेतील पॅलेडिओ सोसायटीला भेट देऊन रहिवाशांशी संवाद साधला. यावेळी माध्यम प्रतिनिधींशी त्या बोलत होत्या. जिल्हा परिषदेच्या माजी अध्यक्षा सविता दगडे, पुणे जिल्हा कार्याध्यक्ष महादेव कोंढरे, गंगाराम मातेरे, शिवाजी बुचडे, दीपाली कोकरे, शिवाजी जांभुळकर, सविता गवारे, निकिता रानवडे, स्वाती ढमाले, दगडू करंजावने, संदीप साठे, सुप्रिया पवार, विजय पवार, रुपाली ढोकळे, चेअरमन चेतन पगारे, गुंजन शहा यांच्यासह राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार) पक्षाचे व महाविकास आघाडीचे पदाधिकारी उपस्थित होते. सुळे पुढे म्हणाल्या, शरद



पवारांच्या रूपाने दिल्लीत असलेला महाराष्ट्राचा बुलंद आवाज संपविण्याची भाषा भाजप करत आहे. उमेदवारी देखील माझ्या मोठ्या वहिनीला दिली. मी ज्या संस्कृतीत वाढले त्या संस्कृतीत मोठ्या भावाची बायको आईच्या जागी आहे. त्यामुळे आईच्या जागेवर मला वहिनी आहेत माझ्या मोठ्या भावाच्या पत्नी आहेत. त्यातच भाजपकडे कुठलाही उमेदवार नाही तो पण कशासाठी तर पवार साहेबांना संपवण्यासाठी. हेच गलिच्छ राजकारण भाजप करतय आहे.

## रामदास आठवलेंचा गौप्यस्फोट, 'देवेंद्र फडणवीस मला शिर्डीतून उमेदवारी देणार होते, पण एकनाथ शिंदे..'

■ मुंबई: संजीनी खाडे

महायुतीने रिपब्लिकन पक्षाला दोन जागा दिल्या पाहिजेत अशी मागणी करणारे रामदास आठवले यांनी एक गौप्यस्फोट केला आहे. महायुतीच्या जागावाटपाचं चित्र बरंच स्पष्ट झालं आहे. अशात मनसेला बरोबर घेणार का? हा प्रश्न आहे. हे सगळं असतानाच रामदास आठवलेंनी एक महत्त्वाचं वक्तव्य केलं आहे. 'मला शिर्डीतून लोकसभा निवडणूक लढवण्याची इच्छा होती. २००९ च्या लोकसभा निवडणुकीत मी शिर्डीतून लढलो होतो. त्यावेळी माझा



पराभव झाला होता. या निवडणुकीच्या वेळी देवेंद्र फडणवीस मला शिर्डीतून उमेदवारी द्यायला तयार होते. इतकंच नाही तर फडणवीस यांनी मला शिर्डीची जागा मिळावी म्हणून प्रयत्न केले. मात्र मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना अडचण असल्याने मला उमेदवारी मिळाली नाही.' असा गौप्यस्फोट रामदास आठवलेंनी केला आहे.

यानंतर रामदास आठवले म्हणाले, २०२४ च्या लोकसभा निवडणुकीसाठी आरपीआयला किमान एक जागा मिळावी असा आमचा आग्रह होता. पण तसं घडलं नाही. देवेंद्र फडणवीस यांनी मला आश्वासन दिलं आहे की २०२६ चा माझा राज्यसभेचा कार्यकाळ संपल्यानंतर रिपाईबद्दल विचार केला जाईल. केंद्रात कॅबिनेट मंत्रिपद रिपाईला मिळावं यासाठी देवेंद्र फडणवीस प्रयत्न करणार आहेत. तसंच राज्यात मंत्रिमंडळ विस्तार होईल तेव्हाही रिपाईला पद दिलं जाईल. महामंडळाची दोन चेअरमन पदं आणि जिल्हा कमिटीमध्ये रिपाईला प्राधान्य दिलं जाईल असं आश्वासन देवेंद्र फडणवीस यांनी दिल्याचंही रामदास आठवलेंनी स्पष्ट केलं.

## केजरीवालांना १५ एप्रिलपर्यंत न्यायालयीन कोठडी

■ मुंबई: माधव अलवा

आपचे सर्वेसर्वा आणि मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांना आज ( दि. १ एप्रिल) दिल्लीतील राऊस एव्हेन्यू न्यायालयाने १५ एप्रिलपर्यंत न्यायालयीन कोठडी सुनावली. दिल्ली मद्य धोरणाशी संबंधित मनी लॉड्रिंग प्रकरणी २१ मार्च रोजी 'ईडी'ने केजरीवाल यांना अटक केली होती. आज त्यांच्या 'ईडी' कोठडीची मूदत संपली होती. दरम्यान, आजच्या सुनावणीपूर्वी अरविंद केजरीवाल यांच्या पत्नी सुनीता केजरीवाल, आपचे नेते सौरभ भारद्वाज, आतिशी, गोपाल राय यांच्यासह अनेक नेते न्यायालयात उपस्थित होते. दिल्लीतील राऊस एव्हेन्यू न्यायालयाने केजरीवाल यांना हजर करण्यात आले. सुनावणीवेळी न्यायालयाने 'ईडी'ला स्टेटस



रिपोर्ट सादर करण्याचे निर्देश दिले. याचिकाकर्त्यांच्या अधिकारक्षेत्रावर भाष्य केलेले नाही, असे न्यायालयाने स्पष्ट केले. यावेळी 'ईडी'ने केजरीवाल यांना १५ दिवस न्यायालयीन कोठडी सुनावण्यात यावी, अशी मागणी केली. दिल्लीतील राऊस एव्हेन्यू न्यायालयाने केजरीवाल यांना १५ एप्रिलपर्यंत न्यायालयीन कोठडी सुनावली. या प्रकरणी २८ मार्च रोजी झालेल्या सुनावणीवेळी न्यायालयाने केजरीवाल यांच्या ईडी कोठडीत १ एप्रिलपर्यंत वाढ केली होती.

केजरीवाल यांच्या वकिलाने तुरुंगात काही औषधे उपलब्ध करून देण्याची मागणी केली आहे. तसेच रामायण, पत्रकार नीरज चौधरी यांचे पंतप्रधान कसे निर्णय घेतात, महाभारत या तीन पुस्तकांची मागणी केली आहे.

## कुठे अवकाळीचा फटका, कुठे उष्णतेच्या लाटेचा इशारा

■ मुंबई: नितीन देवळेकर

कोल्हापूर उपनगरासह करवीर तालुक्यातील काही भागात रविवारी सायंकाळी पावसाने चांगलाच धुमाकूळ घातला. वळवाच्या आलेल्या पावसाने नागरिकांची चांगलीच तारांबळ उडवली. अनेक ठिकाणी आठवडा बाजारात शेतकऱ्यांच्या मालाचे नुकसान झाले.

करवीर तालुक्यातील चाफोडी गावात आठवडी बाजारातील शेतकऱ्यांचा साहित्य अक्षरशा वाहून गेले. साहित्य वाचवण्यासाठी किरकोळ विक्रेत्यांची देखील कसरत सुरू होती. कोल्हापूर जवळील पाचगाव परिसरात पावसाने हजेरी लावली. सुमारे



१५ ते २० मिनिटं जोरदार पाऊस बरसला. साताऱ्यातील पाटणमध्ये अवकाळी पाऊस झाला. अनेक ठिकाणी रविवारी सकाळपासून रिमझिम पाऊस होता. या पावसामुळे कलिंगड, आंबा पिकांना मोठा फटका बसण्याची शक्यता आहे. शेतकऱ्यांच्या शेतीमालाचे पावसामुळे नुकसान झाले. विदर्भात मंगळवारपासून (२ एप्रिल) काही ठिकाणी पुढील तीन दिवस उष्णतेच्या लाटेचा इशारा भारतीय हवामान विभागाने दिला आहे. मध्य भारतात कोरडे वातावरण निर्माण झाल्याने तापमान वाढणार आहे. विदर्भात उष्णतेच्या लाटेमुळे कमाल तापमान ४२ अंश सेल्सियसपेक्षा जास्त जाण्याची शक्यता आहे. रविवारी सोलापुरात राज्यात सर्वाधिक ४१ अंश सेल्सिअसची नोंद झाली आहे. जळगाव, बीड, अकोला, चंद्रपूरमध्येही पारा चाळिशीपार गेला होता. राज्याच्या बहुतेक भागांत कमाल तापमानात घट झाली असली तरीही किमान तापमान २५ अंश सेल्सिअवर कायम आहे.



# शहर भागातील कामे रखडवणाऱ्या कंत्राटदाराकडून अद्याप दंड वसुली नाही, एक महिन्याची मुदत संपूनही मुंबई महापालिकेची चालढकल

■ **मुंबईः नितीन देवळेकर**

शहर भागातील रस्त्याची कामे रखडवणाऱ्या वादग्रस्त कंत्राटदाराला मुंबई महानगरपालिकेने लावलेला ६४ कोटी रुपयांचा दंड कंत्राटदाराने अद्याप भरलेला नाही. दंडाची रक्कम एक महिन्याच्या आत भरण्याचे आदेश पालिका प्रशासनाने कंत्राटदाराला २५ जानेवारीला दिले होते. मात्र दोन महिने उलटले तरी कंत्राटदाराने हा दंड भरलेला नाही तसेच पालिका प्रशासनानेही त्याकडे दुर्लक्ष केले आहे. शहर भागातील रस्ते कंत्राटदार रोडवे सोल्युशन्स इंडिया इन्फ्रास्ट्रक्चर लिमिटेड यांना १६८७ कोटींची कामे देण्यात आली होती. मात्र रस्त्यांची कामे सुरू करण्याचे कोणतेही प्रयत्न या कंपनीने केले नाहीत. ही कामे करण्यात कंत्राटदाराला रस नाही किंवा त्याची क्षमता नाही, असा ठपका पालिका प्रशासनाने याप्रकरणी तयार केलेल्या अहवालात ठेवला होता. कंत्राटदाराच्या दिरंगाईमुळे कंत्राटातील अटींचा भंग झालाच आहे, पण मुंबईकरांचेही नुकसान झाले आहे. असेही या अहवालात म्हटले होते. कंत्राटदाराला ६४ कोटींचा दंड करण्याबरोबरच त्याची अनामत रक्कम व इसारा ठेव रक्कम जप्त करण्याचे आदेशही प्रशासनाने दिले होते. मात्र दोन महिने उलटून गेले तरी त्याची अंमलबजावणी झालेली नाही.

या प्रकरणी भाजपचे माजी नगरसेवक मकरंद नार्वेकर यांनी बृहन्मुंबई महानगरपालिकेला पत्र लिहून रोडवे सोल्युशन्स इंडिया इन्फ्रास्ट्रक्चर लिमिटेड या रस्ते कंत्रादाराकडून दंड वसूल करण्याबाबत पालिका उदासीन का आहे असा प्रश्न विचारला आहे. पालिकेने कंत्राटदारावर कठोर कारवाई करून इतर कंत्राटदारांवरही जरब बसवण्याची गरज असल्याचे त्यांनी या पत्रात म्हटले आहे. तसेच पालिकेला फसवणाऱ्या या कंत्राटदाराला काळ्या यादीत टाकावे आणि त्याच्यावर फौजदारी तक्रार नोंदवण्यात यावी, या मागणीचा पुनरुच्चारही त्यांनी केला आहे. यापुढे रस्त्यांच्या कामांसाठी पालिकेने महानिविदा न मागवता त्याचे विभाजन करून लहान वॉर्डनिहाय निविदा काढल्या पाहिजेत जेणे करून अधिक कंत्राटदार पुढे येतील आणि रस्त्याची कामे पूर्ण करता येईल अशीही सूचना केली आहे. मुंबई महानगरपालिकेने २०२३ या वर्षी रस्त्यांच्या कॉंक्रीटीकरणाची कामे हाती घेतली. त्यात शहर विभागातील कामे कंत्राटदार रोडवे सोल्युशन्स इंडिया इन्फ्रास्ट्रक्चर लिमिटेड (आरएसआयआयएल) या कंपनीला दिली होती. मात्र या कंत्राटदाराने कामे सुरू न केल्यामुळे त्यांना वारंवार समज देण्यात आली होती. तसेच दंडात्मक कारवाई देखील करण्यात आली होती. मात्र तरीही कंत्राटदाराने कामे सुरू केली नाहीत व दंडही भरला नाही. तसेच पालिकेने बोलावलेल्या सुनावणीलाही हजर राहिले नाहीत. त्यामुळे पालिकेने नोव्हेंबरमध्ये पहिल्यांदा कंत्राट रद्द केले. तेव्हा कंत्राटदाराने न्यायालयात धाव घेतली असता त्याचे म्हणणे ऐकून घ्यावे असे आदेश न्यायालयाने पालिका प्रशासनाला दिले होते. त्यानुसार जानेवारी २०२४ मध्ये पालिका प्रशासनाने कंत्राटदाराला सुनावणीसाठी बोलावले होते.

# त्या' दोन्ही जागा कॉंग्रेसच्या, परत घ्या; राज्यातील नेत्यांची गांधींना हाक

■ **मुंबईः रघुवीर जाधव**

**ठाकरे गटाचे पक्षाध्यक्ष उद्धव ठाकरे यांनी आता महाराष्ट्रातील जागा वाटपाबद्दलची चर्चा २०२९ सालीच होईल, असे सांगत लोकसभा मतदारसंघांच्या फेरविचारास ठाम नकार दिला असला तरी सांगली, दक्षिण मध्य मुंबई या दोन्ही जागा कॉंग्रेसच्या आहेत.**

त्या परत घ्या, अशी विनवणी पक्षाचे प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी सोनिया गांधी आणि राहुल गांधी यांना केली आहे. शिवसेनेच्या ठाकरे गटाचा सांगली लोकसभा मतदारसंघात कोणताही प्रभाव नाही तर मुंबईतील दक्षिण मध्य मतदारसंघात कॉंग्रेस शहराध्यक्ष वर्षा गायकवाड उत्तम लढत देत विजयी होऊ शकतात. परिस्थिती



अनुकूल असताना कॉंग्रेसने या दोन्ही जागांसाठी आग्रह धरायला हवा, असे आग्रही प्रतिपादन आज कॉंग्रेस नेते राहुल गांधी यांना करण्यात आले. पक्षाच्या सर्वोच्च नेत्या सोनिया गांधी यांच्याशीही या विषयावर बोलणे झाले.

त्यांनी या संबंधात उद्धव ठाकरे यांच्याशी चर्चा करण्याचे आश्वासन दिले असल्याची माहिती नाना पटोले यांनी 'सकाळ'ला दिली. यासंदर्भात आता हायकमांड योग्य वाटेल तो निर्णय घेतील, असेही पटोले म्हणाले. पहिल्या टप्प्यातील लढतीच्या प्रचारासाठी आज पटोले विदर्भात रवाना झाले.

ते २ एप्रिल रोजी परतणार असून त्यानंतर मविआची बैठक होईल. मोदी सरकारच्या ध्येयधोरणांबद्दल जनता कमालीची नाराज आहे. विदर्भातील पहिल्या टप्प्यात होणाऱ्या निवडणुकीतील सर्व जागा मविआ जिंकेल. ज्येष्ठ भाजप नेते नितीन गडकरीही पराभूत होतील असा विश्वास पटोले यांनी व्यक्त केला. भिवंडीची जागा राष्ट्रवादी कॉंग्रेस शरद पवार गटाला हवी असल्याची चर्चा आहे. मात्र, कॉंग्रेस या जागेबाबत ठाम आहे.

आज दिल्लीचे मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांच्या अटकेचा निषेध करण्यासाठी दिल्लीत आयोजित झालेल्या रॅलीनंतर तेथे हजर असलेल्या उद्धव ठाकरेंशी गांधी मातापुत्र चर्चा करतील, असा विश्वास कॉंग्रेसच्या प्रदेशातील नेत्यांना होता. उद्धव ठाकरे यांनाही पंतप्रधान मोदी यांच्या विरोधातील कौल अपेक्षित असल्याने ते समजूतदारपणा दाखवतील, अशी आशाही नेत्यांनी बोलून दाखवली.

# विरार-अलिबाग महामार्ग फास्ट ट्रॅकवर: विकासाला मिळणार गती

■ **मुंबईः संजीनी खाडे**

मुंबई, ठाणे, नवी मुंबईसह परिसरातील विकासाला चालना देणारा विरार-अलिबाग मल्टिमॉडेल कॉरिडॉर महामार्गाचे काम फास्ट ट्रॅकवर आहे. पहिल्या टप्प्यात ९६ किलोमीटरचा महामार्ग बनवण्यात येणार आहे. या कामासाठी निवड केलेल्या नऊ कंपन्यांना त्यांची मूळ कागदपत्रे महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाकडे (एमएसआरडीसी) मंगळवारपर्यंत सादर करावयाची आहेत. विरार-अलिबाग मल्टिमॉडेल कॉरिडॉरची एकूण लांबी १२६ किलोमीटर आहे. पहिल्या टप्प्यात नवघर (विरार) ते बलवली (पेण) दरम्यान ९६ किलोमीटरचा सुविधांनी परिपूर्ण असा मार्ग बांधला



जाणार आहे. या महामार्गाचे काम अकरा टप्प्यांमध्ये केले जाणार असून निवड झालेल्या कंपन्यांच्या पात्रता कागदपत्रांची तपासणी मंगळवारी (ता. २) होणार आहे. या महामार्गाच्या उभारणीवर १९ हजार ३३४ कोटींचा खर्च केला जाणार असून महामार्गाचे काम वेळेत पूर्ण व्हावे म्हणून एका कंपनीला जास्तीत जास्त दोन पॅकेजचे काम दिले जाणार आहे. पर्यावरण, वन्यजीव आणि सीआरझेड या तीन प्रमुख विभागांची परवानगी बंधनकारक आहे. त्यानुसार एमएसआरडीसीने पर्यावरण विभागाच्या परवानगीसाठी केंद्रीय पर्यावरण विभागाकडे अर्ज केला आहे. डिसेंबर २०२७ पर्यंत काम पूर्ण करण्याचे उद्दिष्ट आहे.

# लोकसभा निवडणूकीच्या तोंडावर दक्षिण मध्य मुंबईत शिंदे गटात वाद, गटबाजीला कंटाळून विभागप्रमुख धानूरकर यांचा राजीनामा

■ **मुंबईः सम्यक कासारे**

लोकसभा निवडणूक तोंडावर असताना दक्षिण मध्य मुंबई मतदारसंघात मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेत वाद उफाळून आला आहे. शिंदे यांच्या शिवसेनेचे उमेदवार खासदार राहूल शेवाळे आणि आमदार सदा सरवणकर यांच्यातील अंतर्गत वादामुळे तेथे गटबाजी सुरू आहे. या गटबाजीला कंटाळून विभाग क्रमांक १२ चे विभागप्रमुख गिरीश धानुरकर यांनी नुकताच आपल्या पदाचा राजीनामा दिला. लोकसभा निवडणूकीमुळे राजकीय वातावरण तापलेले असताना त्यात आता राजकीय पक्षांमधील वादावादीही चव्हाट्यावर येऊ लागली आहे. मुख्यमंत्र्यांचा शिवसेना पक्षही त्याला अपवाद नाही. शिवसेना पक्षाने आपली उमेदवारांची यादी प्रसिद्ध करण्या पूर्वीपासूनच दक्षिण मध्य मुंबईत खासदार राहूल शेवाळे यांनाच पुन्हा उमेदवारी मिळणार हे निश्चित झालेले होते. त्यामुळे परिसरात त्यांनी कामही सुरू केले होते. मात्र त्यांना तेथील अंतर्गत गटबाजीचा फटका बसण्याची शक्यता आहे. माहीम, धारावी, वडाळा या तीन विधानसभा मतदारसंघाचे विभागप्रमुख गिरीश धानुरकर यांच्या राजीनाम्यामुळे या विभागात काही आलबेल नसल्याचे उघड झाले आहे. धानुरकर यांनी शिवसेनेचे मुख्य नेते मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना पत्र लिहून आपला राजीनामा दिला आहे. या पत्रात त्यांनी आपली खदखदही व्यक्त केली आहे. या विभागातील माहीम मतदारसंघातील आमदार सदा सरवणकर आणि खासदार राहूल शेवाळे यांचे फारसे पटत नसल्याचे



सर्वश्रुत आहे. त्यांच्यातील हा वाद आता उफाळून आला आहे. सरवणकर यांच्या शिफारशीमुळेच धानुरकर यांची विभागप्रमुख पदावर नियुक्ती करण्यात आली होती. मात्र आता लोकसभा निवडणूकीच्या तोंडावर गेल्या काही महिन्यांपासून आमदार सरवणकर व त्यांचे पुत्र माजी नगरसेवक समाधान सरवणकर हे आपल्याला पदाधिकाऱ्यांमार्फत मानसिक त्रास देत असल्याचे धानुरकर यांनी मुख्यमंत्र्यांना लिहिलेल्या पत्रात नमूद केले आहे. तसेच सरवणकर यांना आपल्या मर्जीतला विभागप्रमुख हवा असून राहूल शेवाळे यांच्याशी संपर्क न ठेवणारा विभागप्रमुख हवा असल्याचे धानुरकर यांनी म्हटले आहे. त्यामुळे विभागप्रमुख पदाचा राजीनामा देत असल्याचे या पत्रात म्हटले आहे.

# तापत्या राजकीय वातावरणात उष्माघाताचा फटका; उष्मघाताच्या पार्श्वभूमीवर आरोग्य विभागाचा सावधतेचा इशारा!

■ **मुंबईः सम्यक कासारे**

महाराष्ट्रात लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर राजकीय वातावरण एकीकडे जोरात तापत असतानाच दुसरीकडे वाढत्या तापमानाचा फटका विदर्भासह राज्याच्या वेगवेगळ्या भागाला बसत असून उष्माघातामुळे यंदा मार्च महिन्यातच सुमारे ३३ जणांना रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. आरोग्य विभागाने उष्माघाताची दखल घेऊन काळजी घेण्याबाबतचा कृती आराखडा तायार केला असून याबाबतची माहिती राज्यातील विविध महापालिकांसह विविध यंत्रणांना पाठवली आहे.

राज्यात उष्णतच्या लाटेमुळे होणारी जिवितहानी लक्षात घेऊन आरोग्य विभागाने यंदा फेब्रुवारी महिन्यात याबाबतचा कृती आराखडा तयार केला असून आरोग्य यंत्रणेला सतर्क करण्यात आले आहे. तसेच लोकांनी कोणती काळजी घेतली पाहिजे याबाबत व्यापक जनजागृती कार्यक्रमही हाती घेण्यात आल्याचे आरोग्य विभागाचे संचालक डॉ नितीन अंबाडेकर यांनी सांगितले. प्रत्येक जिल्ह्यातील जिल्हाशल्यचिकित्सकांच्या अखत्यारितील आरोग्य यंत्रणांनी व्यापक सर्वेक्षण करणे तसेच उष्णतेसदर्भातील आजारांचे सर्वेक्षण करून नियमितपणे आपले अहवाल आरोग्य विभागाच्या पोर्टलवर संकलित करण्यास सांगण्यात आले आहे. यामुळे ज्या भागात उष्णता विकारांचे प्रमाण वाढलेले आढळेल तेथे तात्काळ आरोग्य यंत्रणेला तसेच महापालिकांशी समन्वय



साधून उपाययोजना केल्या जातील. उष्माघातामुळे होणाऱ्या मृत्यूंचे डेथ ऑडिट जिल्हास्तरिय डेथ ऑडिट समितीकडून एका आठवड्यात करण्याचे आदेशही जारी करण्यात आले आहेत.

देशात १९९२ ते २०१५ या काळात उष्णतेच्या लाटेमुळे २२,५६२ लोकांचा मृत्यू झाला होता. महाराष्ट्रात २०२३ मार्च ते जुलै महिन्यात राज्यात ३,१९१ लोकांना उष्माघाताचा फटका बसून रुग्णालयात दाखल करावे लागले होते तर याच काळात राज्यात २२ जणांचा उष्माघाताने मृत्यू झाला होता. मुंबई महापालिका क्षेत्रात १५५ लोकांना उष्माघाताचा फटका बसला होता तर अमरावती १२५, बुलढाणा ४३, चंद्रपूर १९६, लातूर १९०, नागपूर ३६२, नंदुरबार २२०,नांदेड ९६, पुणे ४०९, रायगड ४१२, ठाणे १५६, वर्धा ३४० आणि यवतमाळमध्ये ९७ जणांना उष्माघाताचा फटका बसला होता.

# वांद्रे-वरळी सागरी सेतूवरील प्रवास महागणार, नवीन पथकर दर लागू

■ **मुंबईः राकेश गायकवाड**

महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाने (एमएसआरडीसी) वांद्रे-वरळी सागरी सेतूवरील पथकर दरात १८ टक्क्यांनी



वाढ केली आहे. त्यानुसार पथकराचे नवीन दर आजपासून लागू झाले असून चारचाकी हलक्या वाहनांना आजपासून ऐकेरी प्रवासासाठी ८५ रुपयांऐवजी १०० रुपये, तर तर मिनी बस, टेम्पोच्या एकेरी प्रवासासाठी १३० रुपयांऐवजी १६० रुपये मोजावे लागतील. त्याचवेळी ट्रक, बससाठी आजपासून १७५ रुपयांऐवजी २१० रुपये असा पथकर असेल. एमएसआरडीसीच्या पथकर करारानुसार दर तीन वर्षांनी पथकरात वाढ होते. त्यानुसार एमएसआरडीसीने नवीन दर जाहीर केले असून ते आजपासून लागू झाले आहेत. त्याचवेळी परतीच्या प्रवासासाठी हलक्या वाहनांना आता ४२.५ रुपयांऐवजी ५० रुपये, मिनी बस, टेम्पोसाठी ६५ रुपयांवरून ८० रुपये तर, बससाठी ८७.५० रुपयांऐवजी १०० रुपये मोजावे लागणार आहेत. मासिक पाससाठीही आजपासून नवे दर लागू झाले आहेत. त्यानुसार हलक्या चारचाकी वाहनांसाठी ५,००० रुपये, मिनी बस, टेम्पोसाठी ८,००० रुपये आणि ट्रक, बस साठी १०,५०० रुपये असे मासिक पासचे दर असणार आहेत.

# सागरी किनारा मार्गावर 'बेस्ट'ची प्रतीक्षाच; स्वतंत्र मार्गिका राखीव असताना अद्याप नियोजन नाही

■ **मुंबईः प्रथमेश चव्हाण**

मुंबई किनारी रस्ता प्रकल्प (कोस्टल रोड) सुरू होऊन १५ दिवस उलटून गेल्यानंतरही या मार्गावरून अद्याप 'बेस्ट'ची सेवा सुरू झालेली नाही. बससाठी स्वतंत्र मार्गिका राखीव असतानाही बेस्टने अद्याप नियोजन केलेले नसल्याने सर्वसामान्यांचा या मार्गावरील प्रवास महागडाच ठरत आहे.

धर्मवीर स्वराज्यरक्षक छत्रपती संभाजी महाराज मुंबई किनारी रस्ता प्रकल्पाची वरळी ते मरिन ड्राइव्ह दक्षिणवाहिनी मार्गिका १२ मार्चपासून खुली झाली. मार्गाचे काम सुरू होण्याच्या आधीपासून बस व रुग्णवाहिकांसाठी स्वतंत्र मार्गिकेचे नियोजन करण्यात



आले होते. मार्गावर अवजड वाहने, दुचाकी, तीन चाकी आणि पादचाऱ्यांना प्रवेश नसल्याने या मार्गावरून जायचे असल्यास केवळ स्वत:चे चारचाकी वाहन किंवा टॅक्सीचाच पर्याय आहे. बेस्टमुळे सर्वसामान्यांनाही तेथून प्रवास करणे शक्य झाले असते. मात्र सध्या या मार्गाचा थोडासाच भाग सुरू झाला असून संपूर्ण मार्ग सुरू झाल्यानंतर 'बेस्ट' बसमार्ग ठरवले जातील, असे बेस्ट प्रशासनातील अधिकाऱ्यांनी 'लोकसत्ता'ला सांगितले.

'बेस्ट'कडे गाडयांचा अपुरा ताफा असल्यामुळे सागरी किनारा मार्गावरून सेवा सुरू होत नसल्याची चर्चा आहे. नवीन गाडयांसाठी कार्यादेश दिलेले असले तरी त्या गाडया येण्यास वेळ लागणार आहे.

# मुंबई महारेराच्या आदेशांच्या अंमलबजावणीतून ९२ कोटींची वसुली

■ **मुंबईः रघुवीर जाधव**

महारेराच्या वसुली आदेशाच्या अंमलबजावणीला अखेर वेग आला आहे. आतापर्यंत घर खरेदीदारांच्या नुकसानभरपाईचे १२५ कोटी रुपये वसूल करण्यात आले आहेत. मुंबईतून सर्वाधिक ९२ कोटी रुपये वसुली झाली आहे. मुंबई शहरातील आठ प्रकल्पांतील १४ वसुली आदेशांपोटी २१.१९ कोटी रुपये वसूल करण्यात आले आहेत. तर मुंबई उपनगरांतील ४० प्रकल्पांतील ७५ आदेशांपोटी ७१.०६ कोटी रुपये वसूल करण्यात आले आहेत. दरम्यान, या आदेशांच्या अंमलबजावणीनुसार रक्कम अदा न करणाऱ्या विकासकांविरोधात कडक कारवाईचा बडगा उगारण्याचा निर्णय महारेराने घेतला




असून संबंधित विकासकाच्या बँक खात्यावर टाच आणण्यात येणार आहे. महारेराकडे मोठ्या संख्येने खासगी विकासकांविरोधात तक्रारी दाखल होत आहेत. या तक्रारींनुसार ग्राहकांची फसवणूक झाल्याचे, रेरा कायद्याचे उल्लंघन झाल्याचे सिद्ध झाल्यानंतर महारेराकडून तक्रारदाराने मालमत्तेसाठी विकासकाकडे भरलेली रक्कम व्याजासह परत करण्याचे आदेश दिले जातात. मात्र या आदेशाचे पालन न करणाऱ्या विकासकांविरोधात महारेराकडून वसुली आदेश (रिकव्हरी वॉरंट) काढले जातात. त्यानुसार विकासकाची मालमत्ता जप्त करून त्याचा लिलाव करण्यात येतो. त्यातून मिळणारी रक्कम संबंधित तक्रारदाराला देण्यात येते. ही प्रक्रिया जिल्हाधिकाऱ्यांच्या माध्यमातून पूर्ण केली जाते.

# तोट्यात असलेल्या 'मोनो'ला येणार चांगले दिवस? प्रवासी क्षमता वाढणार

■ **मुंबईः नितीन देवळेकर**

**वर्षानुवर्षे पांढरा हत्ती बनून राहिलेल्या 'मोनो'ची प्रवासी वाहतूक संख्या आणखी वाढणार आहे. एमएमआरडीए दहा मोनो ट्रेन खरेदी करत असून त्यापैकी दोन गाड्या मुंबईत नुकत्याच दाखल झाल्या आहेत.**

सध्या धावत असलेल्या गाड्यांच्या तुलनेत नव्याने खरेदी केलेल्या गाड्यांची प्रवासी क्षमता दहा टक्क्यांनी अधिक आहे. त्यामुळे चार डब्याच्या एका मोनो ट्रेनने जास्तीत जास्त ६२४ प्रवाशांना प्रवास करता येणार आहे.

एमएमआरडीएने तोट्यात असलेल्या मोनो रेलला बाहेर काढण्यासाठी हालचाली सुरू केल्या आहेत. सध्या चेंबूर-संत गाडगे महाराज चौक या मार्गावर १० गाड्या असून पंधरा मिनिटाला एक याप्रमाणे १४२ फेऱ्या चालवल्या जात आहेत. एक गाडी गेली की प्रवाशांना पुढील गाडी येईपर्यंत सुमारे पंधरा मिनिटे अडकून पडावे लागते. त्यामुळे दोन गाड्यांमधील वेळ कमी करण्यासाठी एमएमआरडीएने वर्षभरापूर्वी प्रत्येकी चार डब्यांच्या दहा गाड्या खरेदी करण्याचे टेंडर काढले होते. त्यानुसार पहिल्या टप्प्यात दोन गाड्या आल्या आहेत. या गाड्यांची बांधणी मजबूत आणि आटोपशीर असल्याने त्यांची प्रवासी क्षमता दहा टक्क्यांनी वाढल्याची माहिती सूत्रांनी दिली.

सध्या धावत असलेल्या चार डब्यांच्या एका गाडीने जास्तीत जास्त प्रवासी वाहून नेण्याची क्षमता ५६८ एवढी आहे. नव्या गाड्यांची क्षमता ५६ने वाढली आहे. त्यामुळे प्रवाशांना दिलासा मिळणार असून मोनो रेलच्या उत्पन्नातही वाढ होणार आहे. मोनो रेलच्या ताफ्यात दोन नव्या गाड्या दाखल होणार आहेत. सुरुवातीला त्यांच्या वेगवेगळ्या चाचण्या होणार आहेत. त्यामध्ये त्या पास झाल्यानंतर आणि रेल्वे सुरक्षा आयुक्तांकडून सुरक्षा प्रमाणपत्र मिळाल्यानंतरच या गाड्या प्रवासी सेवेत आणल्या जाणार आहेत.



# कल्याणची जागा हवी तर ठाण्याचा हट्ट शिंदेंना सोडावा लागेल: भाजपची भुमिका?

**■ कल्याण: आकाश कांबळे**

**महायुतीत जागा वाटपात ठाणे व कल्याणच्या जागेचा तिढा अद्याप सुटलेला नाही. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यासाठी प्रतिष्ठेच्या असलेल्या ठाणे मतदारसंघावर भाजप आपला दावा कायम ठेवून आहे. ठाण्याची जागा मिळावी यासाठी भाजपने कल्याणमधून शिंदे यांची कोंडी केल्याची चर्चा आहे. कल्याणचे खासदार श्रीकांत शिंदे यांची उमेदवारी कल्याणमधून निश्चित असल्याचा प्रचार भाजपनेच येथे मेळावे घेत सुरु केला.**

त्या मेळाव्यांमध्ये स्थानिक कार्यकर्त्यांनी मात्र उघड उघड नाराजी दाखविली असून भाजपचे मंत्री चव्हाण यांनी देखील अप्रत्यक्षरित्या आमच्या सहकार्याशिवाय पर्याय नसल्याचे शिंदे यांना दाखवून देत असल्याचे जाणकार सांगत आहेत.

ठाण्यात चिन्ह तुमचे उमेदवार आमचा असा प्रस्ताव देखील भाजपने सेनेपुढे ठेवला असल्याची माहिती असून कल्याणची जागा हवी तर ठाण्याचा हट्ट शिंदे यांना सोडावा लागेल असाच पवित्रा भाजपने घेतल्याची माहिती जाणकारांनी दिली. महायुतीच्या या तिढ्यामुळे ठाकरे गटाची देखील कोंडी झाली असून त्यांनाही आपला उमेदवार अद्याप निश्चित करता आलेला नाही. महायुतीच्या जागा वाटपाच्या पहिल्या फेरीत मुख्यमंत्र्यांनी बाजी मारत आत्तापर्यंत आपल्या सात खासदारांना उमेदवारी मिळवून दिली आहे. मात्र मुख्यमंत्र्यांचा वरचष्मा असलेल्या ठाणे, पालघर, कल्याण या मतदारसंघातील चित्र अजूनही स्पष्ट झालेले नसल्याने शिंदे समर्थकांमध्ये अस्वस्थता पसरली आहे.

ठाणे मतदारसंघावर भाजप आपला दावा कायम ठेवून आहे. भाजपचे नेते गणेश नाईक यांचे पुत्र माजी खासदार संजीव नाईक यांच्यासाठी भाजपने या जागेवर दावा केला आहे. ही जागा मुख्यमंत्री यांना सोडावी लागली तरी दोघांच्या सहमतीचा उमेदवार




म्हणून नाईक यांनी धनुष्यबाण चिन्हावर ही निवडणूक लढवावी असा प्रस्ताव देखील भाजपने शिंदे यांच्यासमोर मांडला आहे.

यामुळे ठाण्यातील इच्छुकांमध्ये अस्वस्थता निर्माण झाली आहे. ठाण्याची जागा भाजपला मिळावी यासाठी भाजपने कल्याण मधून शिवसेनेची कोंडी केल्याचे चित्र आहे.मुख्यमंत्री शिंदे यांचे पुत्र खासदार श्रीकांत शिंदे यांचा कल्याण हा मतदारसंघ असून या मतदारसंघातून त्यांनाच उमेदवारी मिळावी यासाठी सुरुवातीपासून शिवसेनेने प्रयत्न केले आहेत. शिवसेना व भाजप मधील धुसफुस चव्हाट्यावर आली आणि त्यातच भाजपने कल्याण लोकसभा मतदारसंघावर आपला दावा करत शिंदे यांच्यापुढे अडचणींचा डोंगर उभा केला. मनसेची महायुतीसोबत दिलजमाई झाली आणि भाजपचे सार्वजनिक बांधकाम मंत्री यांनी आचारसंहितेच्या पूर्वी विकास कामांच्या वेळी खासदार शिंदे हेच महायुतीचे उमेदवार असतील अशी घोषणा करत शिंदे यांना खूश केले. मात्र त्यानंतर दिव्यातील भाजपच्या कार्यकर्त्यांनी येथे उमेदवार कोणी असो त्याने कमळ चिन्हावर निवडणूक लढवावी असे निवेदन पक्ष प्रदेशाध्यक्षांना देत शिंदे यांच्याविषयी असलेली नाराजी उघड केली. यानंतर मंत्री चव्हाण यांच्या नेतृत्वाखाली कल्याण लोकसभा मतदारसंघात मेळावे घेतले गेले. या मेळाव्यात शिंदे यांच्याविषयी डोंबिवली येथील कार्यकर्त्यांनी देखील नाराजी असल्याचे घोषणाबाजी करत दाखवून दिले. यावेळी मंत्री चव्हाण यांनी आपल्या कार्यकर्त्यांना मार्गदर्शन करताना म्हटले होते की, ''मला वेगवेगळ्या ठिकाणी पक्षाने जबाबदारी दिल्याने प्रचारासाठी जावे लागणार आहे. त्यामुळे तुम्हालाच येथे उमेदवराचा प्रचार करायचा आहे. मोदी यांना निवडून देण्यासाठी काम करा. पंतप्रधान मोदी यांनी देखील म्हटले पाहीजे की हा मतदारसंघ कार्यकर्त्यांच्या जीवावर जिंकणारा संघ आहे.

नेता येतो भाषण करतो मग परिवर्तन होते असा हा संघ नाही'' असे सांगत त्यांनी अप्रत्यक्षरित्या भाजपच्या कार्यकर्त्यांची असलेली नाराजी व त्यांचे सहकार्य शिंदे यांच्यासाठी किती महत्त्वाचे आहे हे सांगितल्याची चर्चा आहे.

# वंचितचा स्वबळावर लढण्याचा निर्णय योग्यच; केंद्रीय मंत्री रामदास आठवले

**■ डोंबिवली: सतिश सोनावणे**

वंचितने स्वबळावर लढण्याचा निर्णय घेतला आपले उमेदवार उभे केले. प्रकाश आंबेडकर यांनी हा योग्य निर्णय घेतला. त्याची इच्छा महाविकास आघाडीत सामिल व्हायची होती. मात्र त्यांच्याकडे दुर्लक्ष करण्यात आले. त्यामुळे स्वबळावर लढण्याचा जो निर्णय आहे तो योग्यच आहे, दुसरा इलाज अजिबात नाही. महाविकास आघाडीला लुटा लूट करता आली नाही असे म्हणत केंद्रीय मंत्री रामदास आठवले यांनी महाविकास आघाडीला टोला देखील लगावला आहे. डोंबिवलीत राज्यस्तरीय द्वितीय बौद्ध धम्म परिषदेचे आयोजन करण्यात आले होते. या परिषदेला केंद्रीयमंत्री रामदास आठवले यांनी उपस्थिती लावली होती. यावेळी त्यानी पत्रकाराशी संवाद साधताना वंचितचा जो निर्णय आहे तो योग्य निर्णय आहे असे सांगितले. वंचित ने मल्लिकार्जुन यांना पत्र लिहिलं होतं, त्यांना महाविकास आघाडीमध्ये सामील होण्याची इच्छा व्यक्त केलेली होती. पण त्यांच्याकडे दुर्लक्ष करण्यात आलं आणि त्यांनी त्यामुळे स्वबळावर लढण्याचा निर्णय घेतला आहे. त्यांचा योग्य



निर्णय आहे. महाविकास आघाडीला लुटालूट करता आली नाही तर ते काय महाविकास करणार आहेत. दहा वर्षामध्ये आपल्याला जो बदल आहे तो जाणवत आहे आणि अनेक ठिकाणी बदल आपल्याला पाहायला मिळत आहे.त्यामुळे देशासमोर दुसरा पर्याय नाही मोदी हेच एकमेव पर्याय आहेत असे ते म्हणाले. 'माझ्या नावामध्ये जरी असला राम तरी माझ आहे बौद्ध धर्माच काम' असे कविता म्हणत त्यांनी आपल्या भाषणाची सुरवात केली. ते म्हणाले, आम्ही बाबासाहेब आंबेडकरांचे अनुयायी आहोत. सर्वधर्मसमभावाची भूमिका आमची आहे.

# प्रदूषणामुळे कामोठ्यातील नागरिक हैराण

**■ नवी मुंबई: सचिन कदम**

प्रदूषणामुळे कामोठे परिसरात रात्रीच्या वेळी उग्र वास येत असल्याने नागरिकांचे आरोग्य धोक्यात आले आहे. त्यामुळे लहान मुले, ज्येष्ठ नागरिक, गरोदर मातांना आरोग्याच्या तक्रारी उद्भवत आहेत.

महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाचे परिसरातील जल, वायू प्रदूषणाकडे दुर्लक्ष होत आहे. तळोजा औद्योगिक वसाहतीमधील काही रासायनिक कारखाने दूषित पाणी प्रक्रिया न करता कासाडी नदीच्या पात्रात सोडत आहेत. दूषित पाणी कासाडी नदीच्या पात्रातून खारघर, कामोठे, कळंबोली शहरालगत असलेल्या खाडीत जाऊन मिसळत आहे. यामुळे कळंबोली, खारघर, कामोठे परिसरात जल व वायू प्रदूषणात वाढ झाली आहे. शिवाय कारखान्याच्या धुरांड्यातून हवेत सोडण्यात येणाऱ्या



धुरामुळे रात्रीच्या वेळी नागरिकांना त्रास होत आहे. लहान मुले, ज्येष्ठ नागरिकांना डोळे जळजळणे, श्वसनाचा त्रास सहन करावा लागत आहे. गरोदर मातांच्या प्रकृतीवर त्याचे परिणाम दिसून येत आहे. कामोठे येथून खांदेश्वर व मानसरोवर रेल्वेस्थानक गाठताना नागरिकांना मास्क घालण्याची वेळ येत आहे. प्रदूषण मंडळ याकडे दुर्लक्ष करत असल्याने नागरिकांच्या समस्येत वाढ झाली आहे. पनवेल महापालिकेने याकडे लक्ष देण्याची गरज असल्याचा सूर नागरिकांतून उमटत आहे. प्रदूषणामुळे खाडी किनारच्या इमारतीमध्ये राहणाऱ्या नागरिकांना घराच्या खिडक्या व दारे बंद करून बसावे लागत आहे. कामोठे येथील एकता सामाजिक संस्थेने वाढत्या प्रदूषणाविषयी आवाज उठवला होता. यानंतर महाराष्ट्र प्रदूषण मंडळाच्या तात्पुरत्या कारवाईनंतर येथील परिस्थिती पूर्ववत झाली आहे.

# निम्म्या नवी मुंबई शहरावर सीसीटीव्हिंची नजर नाहीच

**■ नवी मुंबई: धनश्री सट्टा**

शहरात सर्वत्र सीसीटीव्ही कॅमेरे बसवण्यासाठी तत्कालिन आयुक्त अभिजीत बांगर यांच्या कार्यकाळात कार्यादेश मिळाल्यानंतर २ वर्षे उलटली तरी अद्याप संपूर्ण शहरावर सीसीटीव्ही कॅमेऱ्यांची नजर



नाही. निम्मे शहर सीसीटीव्ही कॅमेऱ्यांविनाच राहिले आहे. आचारसंहितेच्या आधी मुख्यमंत्री शिंदे यांनी विविध कामांचे पालिकेच्या पालिका मुख्यालयातील सीसीटीव्ही कंट्रोल रुमचे ऑनलाईनद्वारे उद्घाटन केले. अद्याप कोपरखैरणे ते दिघा हे परिमंडळ २ मध्ये सीसीटीव्ही लागले आहेत. परंतू प्रत्यक्षात सीसीटीव्हीची कनेक्टीव्हीटी झाली नाही. तर बेलापूर, नेरुळ, वाशी, तुर्भे हे विभाग मात्र सीसीटीव्हीच्या कक्षेत आले आहेत. महापालिका क्षेत्रात अद्याप १५२४ सीसीटीव्ही कॅमेरे लावले आहेत. त्यातील परिमंडळ १ मध्ये ८३६ तर परिमंडळ ६८८ सीसीटीव्ही कॅमेऱ्यांच्या निगराणीखाली आले असले तरी परिमंडळ २ मध्ये मात्र लावलेल्या ६८८ सीसीटीव्ही कॅमेऱ्यांसाठी आवश्यक असलेल्या जोडणीसाठी सार्वजनिक बांधकाम विभागाची परवानगी मिळण्यात अडचणी येत असल्याची माहिती सूत्रांनी दिली. त्यामुळे कॅमेरे लागूनही परिमंडळ २ मधील सीसीटीव्ही फक्त शोभेच्या वस्तू बनल्या आहेत. सीसीटीव्हीच्या कॅमेऱ्यांची नजर बेलापूर ते वाशी या परिमंडळ १ भागात नववर्षाच्या स्वागतापासून झाली आहे. तर दुसरीकडे कोपरखैरणे ते दिघा या परिमंडळ २ विभागाला मात्र सीसीटीव्हीची अद्याप प्रतीक्षाच आहे. शहरात जवळजवळ एकूण ११९२ सीसीटीव्ही कॅमेऱ्यांची नजर ठेवली जाणार आहे.

# शासकीय आस्थापनांची साडे आठ कोटींची वीजदेयकांची थकबाकी; महावितरणला आर्थिक फटका

**■ वसई: दिगंबर जाधव**

वसई विरार शहरात शासकीय रुग्णालये, पोलीस ठाणे, ग्रामपंचायत, महापालिका,शाळा, सार्वजनिक सेवा अशा शासकीय आस्थापनांनी महावितरणचे सुमारे साडे आठ कोटी रुपयांचे वीज देयक थकीत ठेवले आहे. याचा आर्थिक फटका महावितरणला बसू लागला आहे. वसई विरार मध्ये वसई मंडळाच्या अंतर्गत वीज पुरवठा केला जातो.यात सर्वसामान्य वीज ग्राहकांसह शहरातील शासकीय रुग्णालये, पोलीस ठाणे, शाळा, महापालिकेच्या ग्रामपंचायतिच्या पाणी पुरवठा व पथदिवे यासारख्या सार्वजनिक सेवा, इतर शासकीय आस्थापनांना महावितरणकडून वीज पुरवठा केला जात आहे.मात्र या शासकीय आस्थापना व सार्वजनिक सेवा यांनी महावितरणचे वीज देयक भरले नसल्याने महावितरणचे वीज देयक थकीत राहिले आहे.

सध्या मार्च अखेर सुरू असल्याने महावितरणने थकित वीज देयके वसुली करण्यास सुरुवात केली आहे.ज्यांची मोठ्या प्रमाणात वीज देयके थकीत



आहेत त्यांचा वीज पुरवठा करण्याची मोहीम ही सुरू करण्यात आली आहे. वसई मंडळात महावितरणची ४४ कोटींची थकबाकी आहे. त्यातील साडे आठ कोटी रुपये ही रक्कम शासकीय आस्थापना व सार्वजनिक सेवा यांची आहे अशी माहिती महावितरणने दिली आहे. यात शासकीय व सार्वजनिक सेवेतील ४५ पोलीस ठाणी, २३९ शाळा, २६ रुग्णालये, २२१ महापालिका पाणीपुरवठा, ८०० पालिका पथदिवे, २५ ग्रामपंचायत पाणीपुरवठा, ८० ग्रामपंचायत पथदिवे, ५९० इतर अशा एकूण २ हजार २६ ग्राहकांकडे ८ कोटी ४८ लाख रुपये इतकी वीज देयकाची रक्कम थकीत आहे. वीज देयकांची मोठ्या प्रमाणात रक्कम थकीत असल्याने याचा आर्थिक फटका महावितरणला बसू लागला आहे. त्यामुळे ही थकबाकी वसुलीचे मोठे आव्हान महावितरण पुढे उभे राहिले आहे. वीज देयक भरून महावितरणला सहकार्य करावे अशा सूचना या शासकीय विभागाला करण्यात आल्या आहेत. मात्र वीज देयक भरण्यास पुढे न आल्याने महावितरणची मोठी रक्कम थकीत राहणार आहे.

# प्रवाशाच्या व्हिडीओमुळे मुंबई ट्रेनमधील मोबाइल चोर पकडला आणि एका मृत्यूचंही गूढ उकललं

**■ मुंबई: राकेश गायकवाड**

मुंबई लोकल ट्रेनमधून प्रवाशांचा मोबाइल चोरी होण्याच्या अनेक घटना घडत असतात. या चोरांना पकडण्यासाठी रेल्वे पोलीस कसोशीने प्रयत्न करत असतात. मध्ये रेल्वेच्या कल्याण स्थानकावर अशीच एक धक्कादायक आणि अचंबित करणाची घटना घडली आहे. एका प्रवाशाच्या मोबाइलमधील व्हिडिओमुळं मोबाइल चोर तर पकडला गेलाच, पण त्याशिवाय एका मृत्यूचं गूढ उकलण्यातही पोलिसांना यश मिळालं. झाहीद झैदी नामक प्रवाशी आपल्या मोबाइलमध्ये व्हिडिओ रेकॉर्ड करत होता. इतक्यात आकाश जाधव नामक चोराने त्याचा मोबाइल हिसकावण्याचा प्रयत्न केला. पण झैदीने प्रसंगावधान दाखविल्यामुळे आकाशला मोबाइल घेऊन पळ काढता आला नाही. एनडीटीव्हीने दिलेल्या बातमीनुसार, झैदीचा मोबाइल चोरत असताना व्हिडिओ चित्रीकरण सुरू असल्यामुळे चोराचाही चेहरा



त्यात रेकॉर्ड झाला. पोलिसांकडून सदर चोराला पकडण्यासाठी मदत मिळावी म्हणून झैदीने सदर व्हिडिओ सोशल मीडियावर पोस्ट केला. सदर व्हिडिओ व्हायरल झाल्यानंतर कल्याण रेल्वे पोलिसांची त्यावर नजर खिळली. त्या व्हिडिओत दिसणाऱ्या आकाश जाधवला कल्याण पोलिसांनी अटक केली. कल्याण रेल्वे पोलीस अधिकारी पंढरीनाथ कांदे यांनी सांगितले की, मंगळवारी आम्ही चोराला अटक केली. त्याच्यावर याआधीही ठाण्यात काही गुन्हे दाखल होते. जाधवकडून आम्हाला आणखी एक मोबाइल मिळाला. हा मोबाइल कुठून मिळवला? असा प्रश्न पोलिसांनी विचारला असता जाधवला उत्तर देता आले नाही. मात्र मोबाइल स्विच ऑन केल्यानंतर सदर मोबाइल प्रभास भांगे नावाच्या व्यक्तीचा असल्याचे समोर आले आणि इथेच एका मृत्यूचं गूढ उकललं.

# बायकोला धडा शिकविण्यासाठी अजब शक्कल, दादर आणि कल्याण स्थानक बॉम्बने उडवून देण्याची धमकी

**■ वसई: दिगंबर जाधव**

सोडून गेलेल्या बायकोला धडा शिकवण्यासाठी एका इसमाने चक्क दादर आणि कल्याण रेल्वे स्थानक बॉम्बने उडवून देण्याची धमकी दिली. मात्र नालासोपारा येथील पेल्हार पोलिसांनी अवघ्या दोन तासांत आरोपीला शोधून त्यांच्या मुसक्या आवळल्या. शुक्रवारी रात्री ११ च्या सुमारास मीरा-भाईदर वसई विरार पोलीस आयुक्तालयाच्या नियंत्रण कक्षावर एक निनावी दूरध्वनी आला होता. फोन करणाऱ्या इसमाने दादर आणि कल्याण रेल्वे स्थानक बॉम्बने उडवून देणार असल्याची धमकी दिली. यामुळे पोलीस यंत्रणा सतर्क झाली. हा फोन नालासोपारा परिसरातून आला होता, त्यामुळे पेल्हार पोलिसांनी याचा तपास सुरू



केला. वरिष्ठ पोलीस निरीक्षक जितेंद्र वनकोटी तसेच पोलीस उपनिरीक्षक तुकाराम भोपळे यांनी रातोरात तांत्रिक विश्लेषण करून तपासाला सुरुवात केली. आरोपीचा मोबाईल क्रमांक बंद होता.

# वसई किल्ला परिसरात बिबट्याचा वावरष्ठ नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण; वनविभागाकडून शोध सुरू

**■ वसई: दिगंबर जाधव**

वसई किल्ल्याच्या परिसरात बिबट्याचा वावर असल्याने खळबळ उडाली आहे. त्याचा शोध घेण्यासाठी वनविभागाने लावलेल्या कॅमेऱ्यात सुद्धा बिबट्या असल्याचे निदर्शनास आले आहे.या बिबट्याच्या दहशतीमुळे नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण पसरले आहे.



वसई पश्चिमेच्या भागात वसईचा ऐतिहासिक किल्ला आहे. या किल्ल्याच्या परिसरात मोठ्या प्रमाणात झाडे झुडपे आहेत. या परिसरात शुक्रवारी रात्री आठ वाजण्याच्या सुमारास बिबट्याचा संचार सुरू असल्याचे वृत्त समजताच आजूबाजूच्या परिसरात खळबळ उडाली आहे. या घटनेची माहिती वनविभागाला मिळताच किल्ल्याच्या परिसरात खात्री करण्यासाठी ट्रॅप कॅमेरे लावले होते. या ट्रॅप कॅमेऱ्यात बिबट्याची दृश्य कैद झाली असून बिबट्याचा वनविभागाकडून शोध सुरू असल्याची माहिती वनविभागाने दिली आहे.

किल्ल्याच्या भागाला लागून ठिकाणी मोठ्या प्रमाणात नागरी वस्ती व कोळीवाडा आहे. याशिवाय रात्रीच्या वेळी व सकाळी या भागातील रस्त्यावर नागरिक चालण्यासाठी जातात. आजूबाजूला घनदाट झाडे झुडपे असल्याने झुडपांमध्ये लपून बसलेला बिबट्या दिसून येणार नाही त्यामुळे नागरीकांवर हल्ला होण्याची शक्यता आहे. त्यामुळे या परिसरातून ये जा करताना, रात्रीच्या सुमारास बाहेर पडताना सावधानता बाळगावी असे आवाहन वनविभागाकडून नागरिकांना करण्यात आले आहे. या बिबट्याला दुचाकीस्वाराची धडक लागली असल्याची माहिती समोर आली आहे. त्याचा शोध वनविभागाकडून सुरू करण्यात आला आहे.

# ठाणे शहरातील तीनशे सीसीटिव्ही कॅमेरे बंद, कक्षातील संबंधित कर्मचाऱ्यांना आयुक्तांनी घेतले फैलावर

**■ ठाणे: तृप्ती गोरे**

महापालिका क्षेत्रातील नागरिकांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीकोनातून बसविण्यात आलेल्या १४०० पैकी ३०० सीसीटिव्ही कॅमेरे बंद असल्याची बाब समोर आली असून ही बाब नियंत्रण कक्षाच्या पाहणीदरम्यान निर्दशनास येताच नवनियुक्त आयुक्त सौरभ राव यांनी नाराजी व्यक्त केली. तसेच नियंत्रण कक्षाचे कामकाज नेमके कसे चालते, याविषयी आयुक्त राव यांनी विचारलेल्या प्रश्नांमुळे संबंधित कर्मचाऱ्यांची भंबेरी उडाली आणि यानंतर आयुक्त राव यांनी त्यांना फैलावर घेऊन त्यांची कानउघाडणी केली, अशी माहिती पालिका सुत्रांनी दिली. ठाणे महापालिका क्षेत्रातील विविध रस्त्यांवर सोनसाखळी चोरीचे प्रकार काही वर्षांपुर्वी वाढले होते. त्याचबरोबर भामट्यांकडून बोलण्यात गुंतवून पैसे लुटून नेण्याचे प्रकारही वाढले होते. अशा रस्त्यावरील गुन्ह्यांना आळा बसावा आणि त्याचबरोबर शहरातील कायदा व सुव्यवस्था अबाधित




रहावी या उद्देशातून ठाणे शहरात सीसीटिव्ही कॅमेरे बसविण्याची योजना पालिकेने राबविली. या योजनेतून ठाणे, कळवा आणि मुंब्रा शहरात सुरक्षेच्या दृष्टीने महापालिकेने १ हजार ४०० सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्यात आले आहेत. या कॅमेऱ्यांमध्ये चित्रित होणारी सर्व माहिती हाजुरी येथील नियंत्रण कक्षात संकलित केली जात असते. त्याचा फायदा शहरातील विविध गुन्ह्यांच्या तपास कामामध्ये पोलिसांना या कॅमेऱ्यांचा उपयोग झालेला असून त्या माध्यमातून त्यांना गुन्हेगारांचा माग काढून त्यांना पकडणे शक्य झाले आहे. याशिवाय, नागरिक आणि लोकप्रतिनिधींच्या मागणीनुसार शहराच्या विविध भागात आणखी ४३ सीसीटिव्ही कॅमेरे बसविण्याचा निर्णय प्रशासनाने नुकताच घेतला आहे. असे असतानाच, शहरात यापुर्वी बसविण्यात आलेल्या १४०० पैकी ३०० सीसीटिव्ही कॅमेरे बंद असल्याची बाब समोर आली आहे. ठाणे महापालिका आयुक्त सौरभ राव यांनी पावसाळ्यापुर्वी कामांचा आढावा घेण्यास सुरूवात केली असून त्याचबरोबर त्यांनी हाजुरी येथील नियंत्रण कक्षाची पाहाणी करून तेथील कामकाजाचा आढावा घेतला. यावेळी शहरातील तीनशे कॅमेरे बंद असल्याची बाब त्यांच्या निदर्शनास आली. शिवाय, मुंब्रा येथील एकाच भागात कॅमेरे सुरू असल्याचेही निदर्शनास आले. कॅमेऱ्याला जोडण्यात आलेल्या तारा तुटल्या असून त्या जोडणीचे काम सुरू असल्याची माहिती प्रशासनाकडून यावेळी त्यांना देण्यात आली. तसेच नियंत्रण कक्षाचे कामकाज नेमके कसे चालते. नागरिकांकडून आलेल्या तक्रारी संबंधित विभागाकडे कशा पाठविल्या जातात आणि त्यावर कशाप्रकारे कार्यवाही होते, असे अनेक प्रश्न आयुक्तांनी तेथील कर्मचाऱ्यांना विचारले.

# झोपडपट्टी स्वच्छतेचे बहुचर्चित कंत्राट न्यायालयीन कचाट्यात, निविदेला ३ एप्रिलपर्यंत मुदतवाढ

■ मुंबई: माधव अलवा

झोपडपट्ट्यांमध्ये स्वच्छतेसाठीचे १,२०० कोटींचे कंत्राट न्यायालयीन वादात सापडले आहे. कंत्राटदार नेमण्याच्या मुंबई पालिका प्रशासनाच्या निर्णयाविरोधात बेरोजगार संस्था व बचतगट यांनी न्यायालयात धाव घेतली आहे. या निविदा प्रक्रियेला स्थगिती दिली नसली तरी निविदाकार पुढे येत नसल्याचे वास्तव आहे. त्यामुळे या कामाच्या निविदा प्रक्रियेला पालिकेने तिसऱ्यांदा मुदतवाढ दिली असून ३ एप्रिलपर्यंत निविदा भरता येतील.

शहरातील झोपडपट्ट्यांमध्ये स्वच्छतेसाठी चार वर्षांचे कंत्राट देण्यात येणार आहे. तब्बल १२०० कोटींचे कंत्राट दिले जाणार असून त्यासाठी निविदा प्रक्रिया राबवण्यास फेब्रुवारी महिन्यात सुरूवात झाली आहे. खाजगी जागेवर असलेल्या झोपडपट्ट्यांमधील स्वच्छतेसाठी मुंबईत यापूर्वी ह्यस्वच्छता मुंबई प्रबोधन अभियानहण या योजनेअंतर्गत स्वच्छतेची कामे केली जात होती. त्यात स्वयंसेवी संस्थांमार्फत घरोघरी कचरा उचलणे, शौचालयांची स्वच्छता केली जात होती. मात्र ही कामे नीट केली जात नसल्याचा ठपका ठेवून पालिका प्रशासनाने आता या




संस्थांकडील कामे थांबवून नवीन कंत्राटदार नेमण्याचे ठरवले आहे. पालिकेच्या या निर्णयाला बृहन्मुंबई बेरोजगार सेवा सहकारी संस्था फेडरेशन या संस्थेने विरोध केला होता. या संस्थेने पालिकेच्या निर्णयाविरोधात न्यायालयात धाव घेतली आहे.

स्वच्छ मुंबई प्रबोधन अभियान योजना ही २०१३ पासून पालिकेमार्फत राबवली जाते. त्यात बेरोजगार सहकारी संस्थेशी निगडीत संस्था, अपंग संस्था, बचतगट, महिला संस्था, बेरोजगार संस्था यांना सहा महिन्यांचे कंत्राट त्यांना दिले जाते. यात दरडोई सहा हजार रुपये मानधन दिले जाते. मात्र आता प्रतिमाणशी २१,८०० रुपये मानधन दिले जाणार आहे. शिवाय नव्याने समाविष्ट केलेल्या नियमांमुळे बेरोजगार संस्था सहभागी होऊ शकणार नाहीत. संस्थेची उलाढाल पाचशे कोटी रुपये असलेल्या संस्थेलाच ही निविदा भरता येणार आहे. त्यामुळे आताच्या संस्था या निविदा प्रक्रियेत सहभागी होऊ शकणार नाहीत. त्यामुळे एका विशिष्ट कंत्राटदाराला हे कंत्राट देण्याचा पालिका प्रशासनाचा प्रयत्न असल्याचा आरोप संस्थेने केला आहे.

दरम्यान, या प्रकरणी न्यायालयाने स्थगिती देण्यास नकार दिला आहे. त्यामुळे पालिका प्रशासनाने निविदा प्रक्रिया सुरू ठेवली आहे. मात्र न्यायालयीन वादामुळे निविदाकार निविदा भरत नसल्याचे घनकचरा विभागातील अधिकाऱ्यांचे म्हणणे आहे. या निविदाप्रक्रियेत समाविष्ट करावे, अशी मागणी बेरोजगार संघटनांनी केली असली तरी हे कंत्राट १२०० कोटींचे असल्यामुळे या कंत्राटासाठी किमान १२ ते १४ कोटींची अनामत रक्कम भरावी लागेल.

# यंदाच्या उन्हाळयात राज्यभर पुरेसा रक्तसाठा

■ मुंबई: विशाल कारंडे

दरवर्षी उन्हाळयामध्ये रक्ताचा प्रचंड तुटवडा निर्माण होतो आणि त्यामुळे रुग्णांचे हाल होतात. यातून मार्ग काढण्यासाठी राज्य रक्त संक्रमण परिषदेने आध्यात्मिक आणि सामाजिक संस्थांना रक्तदान शिबिरे आयोजित करण्याचे आवाहन केले होते. त्याला प्रतिसाद देत राज्यभरात फेब्रुवारीमध्ये ८४७ रक्तदान शिबिरे घेण्यात आली. त्यामुळे तूर्तास राज्यात रक्ताचा पुरेसा साठा उपलब्ध झाला आहे. दरवर्षी उन्हाळयात निर्माण होणारा रक्ततुटवडयाचा प्रश्न लक्षात घेत यंदा राज्य रक्त संक्रमण परिषदेने आधीपासून प्रयत्न सुरू केले. त्यानुसार रक्त संक्रमण परिषद आणि श्री जगदगुरू नरेंद्राचार्य महाराज संस्थानातर्फे १० ते २५ फेब्रुवारीदरम्यान राज्यभर विविध ठिकाणी रक्तदान शिबिरे घेण्यात आली. १५ दिवसांत ८४७ रक्तदान शिबिरांचे आयोजन करून ७८,२२१ युनिट रक्त संकलित करण्यात आले. उन्हाळयामध्ये रक्तदान केल्याने आरोग्यावर कोणताही दुष्परिणाम



होत नाही. मात्र रक्तदान करण्यापूर्वी सबंधित व्यक्ती भर उन्हातून गेली असेल किंवा तिच्या शरीरातील पाणी कमी झाले असेल (निर्जलीकरण) तर तिने रक्तदान करू नये. निर्जलीकरण झालेले असताना रक्तदान केल्यास रक्तदाब कमी होण्याची किंवा चक्कर येण्याची शक्यता असते. त्यामुळे रक्तदानापूर्वी थोडी विश्रांती घ्यावी आणि भरपूर पाणी प्यावे, असे आवाहन इंडियन सोसायटी ऑफ क्रिटिकल केअर मेडिसिन, मुंबई शाखेचे सचिव डॉ. भरत जगियासी यांनी केले. उन्हाळयात मार्च ते मे दरम्यान नागरिक पर्यटनाला किंवा गावाकडे जातात. नागरिकांचा फारसा प्रतिसाद मिळत नसल्याने रक्तदान शिबिरे आयोजनाचे प्रमाण घटते. परिणामी दरवर्षी उन्हाळयात मोठया प्रमाणावर रक्ततुटवडा निर्माण होतो. त्यामुळे राज्य रक्त संक्रमण परिषदेकडून गणेशोत्सव मंडळे, धार्मिक संस्था, सामाजिक संस्था, विविध संघटना, मित्र मंडळांना रक्तदान शिबिराचे आयोजन करण्याचे आवाहन केले जाते.

# म्हाडा भूखंडावरील न्यायाधीशांचे घर प्रति चौरस फूट साडेनऊ हजार रुपये!

■ मुंबई: राकेश गायकवाड

ओशिवरा येथील 'सुरभी' या आजी-माजी न्यायाधीशांच्या सहकारी गृहनिर्माण संस्थेतील १५०० चौरस फुटाच्या सदनिकेची किंमत एक कोटी ४२ लाख ९३ हजार ३६७ रुपये इतकी निश्चित करण्यात आली आहे. ओशिवरासारख्या परिसरात प्रति चौरस फूट फक्त साडेनऊ हजार रुपये दराने न्यायाधीशांना घरे मिळणार आहेत. ओशिवरा येथील म्हाडाचा तीन हजार चौरस मीटर भूखंड उच्च न्यायालयाच्या न्यायाधीशांच्या 'सुरभी' सहकारी गृहनिर्माण संस्थेला सप्टेंबर २०१५ मध्ये देण्यात आला. हा मूळचा १० हजार ५०३ चौरस मीटर भूखंड यूटीआय कर्मचाऱ्यांच्या साईसमृद्धी सहकारी गृहनिर्माण संस्थेला देण्यात आला होता. परंतु, त्यातही अनियमितता झाल्याने म्हाडाने उच्च न्यायालयात धाव घेतली. त्यात म्हाडाच्या वाट्याला हा तीन हजार चौरस मीटर भूखंड आला. या भूखंडावर म्हाडाने मध्यमवर्गीयांसाठी ७० घरांची योजना राबविण्याचे ठरविले. त्यानुसार २०१० मध्ये मे. बी. जी. शिर्के कंपनीला स्टिल्ट व २४ मजल्यांची इमारत बांधण्याबाबत स्वीकृती पत्रही दिले. मात्र, ती योजना आकार घेऊ शकली नाही. अखेरीस हा भूखंड न्यायाधीशांच्या गृहनिर्माण संस्थेला म्हाडा कायदा १३(२) मध्ये देण्यात आला. स्टिल्ट अधिक तीन मजली पोडिअम अधिक ३२ मजले अशी ९२ सदनिकांची इमारत बांधण्याचे कंत्राट मे. बी. जी. शिर्के कंपनीलाच देण्यात आले. या पोटी १५९ कोटी ९३ लाख ६६ हजार २२ रुपयांची प्रशासकीय मान्यता असलेला ठराव म्हाडा प्राधिकरणाने मंजूर केला. पहिल्या टप्प्यात मे. शिर्के कंपनीला ६० सदनिका बांधण्यासाठी स्वीकृतीपत्र देण्यात आले होते. आता ७२ सदनिकांच्या बांधणीसाठी अंदाजे ९० कोटींचे कंत्राट देण्यात आले आहे. प्राधिकरणानै अलीकडे १०२ कोटींच्या खर्चाला मंजुरी दिली आहे. याआधी १०६० चौरस फूट कारपेट आकाराची ९२ घरे बांधली जाणार होती. आता १५०० चौरस फुटाची ७२ घरे मिळणार आहेत. न्यायाधीशांच्या सोसायटीच्या इमारत उभारणीसाठी म्हाडाने दिलेली प्रशासकीय मंजुरी रक्कम भरमसाट असल्याचे स्पष्ट झाले आहे. या प्रकल्पासाठी सुरुवातीला १५९ कोटींची प्रशासकीय मंजुरी घेण्यात आली होती. आता प्रत्यक्षात १०२ कोटी इतकाच खर्च असल्याचे स्पष्ट झाले आहे.

# पुण्यात ४ जूनपर्यंत दारूचे नवे परवाने, रिन्युएशन बंद

■ पुणे: अभिजीत येरल्लू

लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर शहरासह जिल्ह्यातील देशी, विदेशी दारू, बिअर, वाइन विक्रीचे नवे परवाने, परवाना दुरुस्ती, हस्तांतरण आणि नूतनीकरण प्रक्रिया आचारसंहिता संपेपर्यंत बंद ठेवण्यात आली आहे. तसेच प्रत्यक्ष मतदानाच्या ४८ तास अगोदरपासून मतदान प्रक्रिया संपेपर्यंत आणि मतमोजणीच्या दिवशी कोरडा दिवस (ड्राय डे) म्हणून घोषित करण्यात आला आहे. त्यामुळे या दिवशी मद्य विक्री करण्यास मनाई करण्यात आली आहे. याबाबतचे आदेश जिल्हाधिकारी आणि जिल्हा निवडणूक अधिकारी डॉ. सुहास दिवसे यांनी आदेश काढले आहेत. जिल्ह्यातील बारामती मतदारसंघासाठी ५ मे रोजी सायंकाळी सहा वाजल्यापासून ७ मे रोजी प्रत्यक्ष मतदान प्रक्रिया संपेपपर्यंत, तर पुणे, मावळ आणि शिरूर या तीन लोकसभा



मतदारसंघांसाठी ११ मे रोजी सायंकाळी सहा वाजल्यापासून १३ मे मतदानाच्या दिवशी मतदान संपेपर्यंत मद्यविक्री बंद राहणार आहे. तसेच लोकसभा निवडणुकीच्या मतमोजणीच्या दिवशी म्हणजेच ४ जून रोजी संपूर्ण दिवस सर्व मद्यालये, मद्य विक्री दुकाने आणि इतर मद्यविषयक आस्थापना बंद राहणार आहेत. ड्राय डे पाळण्याच्या अनुषंगाने बारामती आणि इतर तीन मतदारसंघाच्या मतदानाच्या ४८ तास अगोदर देशी, विदेशी दारूचे बार, दुकाने आणि ताडी केंद्र बंद ठेवण्यात येणार असून यांच्या वाहतुकीवरही निर्बंध असणार आहेत. केवळ परवानाधारकांना दारू निर्मिती करता येऊ शकणार आहे. मात्र, विक्री, वाहतूक बंद ठेवण्यात येणार आहे. या नियमांचे पालन न केल्यास महाराष्ट्र मद्यनिषेध अधिनियम १९४९ आणि त्याअंतर्गत तरतुदीनुसार कठोर कायदेशीर कारवाई करण्यात येणार असल्याचा इशारा आदेशात देण्यात आला आहे.

# पनवेलमध्ये घरगुती गॅसचा काळाबाजार

■ पनवेल: सतिश सोनावणे

तालुक्यातील उसर्ली गावामध्ये घरगुती गॅसमधून गॅस चोरी करणाऱ्या एकाला पनवेल शहर पोलिसांनी ताब्यात घेतले असून अन्य एक जण पोलिसांच्या तावडीतून निसटला आहे. पोलिसांच्या या कारवाईमुळे गॅसचा काळाबाजार पुन्हा उजेडात आला आहे. यापूर्वी कळंबोली येथे पोलीस उपायुक्तांनी धाड टाकून टँकरमधून गॅस चोरीचे प्रकरण उजेडात आणले होते.

उसर्ली गावाजवळील शिव मंदिराशेजारील मोकळ्या जागेत गॅसचा काळाबाजार सुरू असल्याची माहिती पनवेल शहर पोलिसांना मिळाली होती. त्यानुसार पोलिसांनी बुधवारी दुपारी सापळा रचला. एका तीन आसनी रिक्षामध्ये गॅस सिलिंडरमधून गॅस काढून तो रिकाम्या काळ्या रंगाच्या बाटल्यात भरला जात असताना पोलिसांनी २१ वर्षीय मनोजकुमार बिश्नोई याला ताब्यात घेतले. मनोजचा साथीदार तेथून निसटला. मनोज हा याच परिसरातील ओमकार इमारतीमध्ये राहतो. तो मूळचा



राजस्थान येथील बिकानेर जिल्ह्यातील नानेदडा गावातील रहिवासी आहे. मनोज हा एका गॅसपुरवठा करणाऱ्या एजन्सीमध्ये कामाला आहे. पोलिसांनी रिक्षासोबत भारत गॅस कंपनीचे सहा सिलिंडर जप्त केले आहेत. तसेच पोलिसांना रिक्षात लोखंडी नळी सापडली. याच लोखंडी नळीच्या माध्यमातून मनोज व त्याचा साथीदार गॅस मोठ्या बाटल्यातून काढून लहान बाटले भरत होता. काळ्याबाजारातून मिळालेले सिलिंडर तो परिसरात विक्री करत असल्याचे पोलिसांच्या तपासात निष्पन्न झाले आहे.

या घटनेमुळे घरगुती गॅस सिलिंडरच्या पुरवठ्यामधून मिळणारा गॅस हा अपुरा पुरवठा होत असल्याची साशंकता रहिवाशांनी व्यक्त केली आहे. पनवेलमध्ये गॅसचा काळाबाजार करणारी मोठी टोळी सक्रिय असून पोलिसांसोबत जिल्ह्याच्या महसूल विभागाच्या पुरवठा विभागाने सतर्क राहण्याची गरज आहे. पोलिसांनी केलेल्या या कारवाईमुळे घरगुती गॅस सिलिंडरमधून गॅस चोरी करणाऱ्या टोळीचे धाबे दणाणले आहे.

# पोलीस हवालदार पदांसाठी भरती, तृतीयपंथीयांना अतिरिक्त गुण देण्याच्या आदेशाला अंतरिम स्थगिती देण्यास नकार

■ मुंबई: सचिन कदम

पोलीस हवालदार पदाच्या भरतीसाठी पात्र होता यावे याकरिता दोन तृतीयपंथीयांना अतिरिक्त गुण देण्याचे आदेश महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरणाने (मॅट) राज्य सरकारला दिले होते. या आदेशाला अंतरिम स्थगिती देण्यास उच्च न्यायालयाने नकार दिला आहे. याबाबतच्या न्यायाधिकरणाच्या २९ नोव्हेंबर २०२३ रोजीच्या आदेशाला राज्य सरकारने उच्च न्यायालयात आव्हान दिले आहे. या अपिलावरील सुनावणीच्या वेळी न्यायमूर्ती ए. एस. चांदूरकर आणि न्यायमूर्ती जितेंद्र जैन यांच्या खंडपीठाने न्यायाधिकरणाच्या आदेशाला अंतरिम स्थगिती देण्यास नकार दिला. त्याचवेळी, संबंधित दोन तृतीयपंथीय उमेदवारांना नोटीस बजावून राज्य सरकारच्या अपिलावर भूमिका स्पष्ट करण्याचे आदेश दिले. रोजगार व शिक्षणात तृतीयपंथीयांना आरक्षण देण्याचे कोणतेही आदेश न्यायाधिकरण देऊ शकत नाहीत. परंतु सरकारने तृतीयपंथीयांना मुख्य प्रवाहात आणण्यासाठी ठोस उपाययोजना करायला हव्यात. त्याचाच भाग म्हणून भरती प्रक्रियेत पात्र होण्यासाठी दोन्ही तृतीयपंथीय उमेदवारांना अतिरिक्त गुण देऊन त्यांचा हवालदार पदासाठी विचार करावा, असे आदेश मॅटने सरकारला दिले होते.

राज्य सरकारने नोव्हेंबर २०२२ मध्ये पोलीस हवालदारांच्या १४,९५६ जागांसाठी जाहिरात प्रसिद्ध केली होती. त्यावेळी, भरतीप्रक्रियेत तृतीयपंथीयांसाठी आरक्षण देण्याचा मुद्दा पुढे आला होता.



भरतीप्रक्रियेच्या ऑनलाइन अर्जामध्ये तृतीयपंथीयांसाठी स्वतंत्र रकाना किंवा पर्याय उपलब्ध करण्याचे आणि सरकारी नोकऱ्यांमध्ये आरक्षण देण्याचे आदेश सरकारला देण्याची मागणी करून दोन्ही उमेदवारांनी न्यायाधिकरणात धाव घेऊन केली होती. त्यावर, न्यायाधिकरणाने उपरोक्त आदेश दिले होते. सरकारने अपिलात, न्यायाधिकरणाने पोलीस हवालदारांच्या भरतीसाठी एकूण गुणवत्ता यादीवर होणारा परिणाम विचारात न घेता असा दिलासा दिल्याचे आणि त्यामुळे गुणवंत उमेदवारांच्या संभाव्यतेवर परिणाम होईल, असा दावा केला आहे.

# लोकसभा निवडणुकीत प्रहार आणि मनोज जरांगे एकत्र येणार? बच्चू कडू म्हणाले...

■ मुंबई: प्रतिनिधी

लोकसभा निवडणुकीत 'मराठा' मतपेढीची ताकद दाखवण्यासाठी प्रत्येक गावातून दोन उमेदवार देण्याचा निर्णय रद्द घेतल्यानंतर अपक्ष उमेदवार



उभे करण्यास मराठा आरक्षण आंदोलनाचे नेते मनोज जरांगे यांनी नकार दिला. मराठा समन्वयक गावोगावी गेले नाहीत. जे गेले त्यांनी चुकीची माहिती आणली. त्यामुळे अपक्ष उमेदवार उभं करणं शक्य नाही. तसे केल्यास उमेदवार निवडून येणार नाहीत, असं सांगत जरांगे यांनी राजकीय आखाडयातून माघार घेतली आहे. दुसऱ्या बाजूला मनोज जरांगे पाटील यांचा पाठिंबा मिळवण्यासाठी अनेक पक्ष आणि नेते प्रयत्न करत आहेत. आगामी निवडणुकीत मनोज जरांगे आपल्या बाजूने उभे राहिले तर मराठा समुदायाची मतं आपल्याला मिळतील असं अनेक उमेदवारांना आणि पक्षांना वाटतं. दरम्यान, आगामी निवडणुकीत अचलपूरचे आमदार बच्चू कडू यांचा प्रहार जनशक्ती पक्ष आणि मनोज जरांगे पाटील एकत्र येणार असल्याची चर्चा आहे. यावर बच्चू कडू यांनी प्रतिक्रिया दिली आहे.

# डिझेल बसगाड्यांची दुरवस्था, एनएमएमटीच्या डिझेलवरील बसगाड्यांची तात्पुरती डागडुजी करण्यावर भर

■ नवी मुंबई: धनश्री सट्टा

नवी मुंबई मनपाचा उपक्रम असलेली एनएमएमटीची बस कितीही उत्तम सुविधा देत असल्याचा दावा केला जात असला तरी एनएमएमटीच्या ताफ्यातील डिझेल बसची अत्यंत दुरवस्था झाली आहे. दरवेळी तात्पुरती डागडुजी करून बस मार्गस्थ केली जात आहे. अत्यंत अस्वच्छ, फाटलेले सीट कव्हर, तुटलेली आसने, उभ्या प्रवाशांना आधार म्हणून कसेबसे उभे असलेले खांब, त्यात गिअर बदलताना चालकाची होणारी तारांबळ अशा अवस्थेतून डिझेल बसमधून प्रवास केला जात आहे.

वर्षानुवर्षे डिझेल बसगाड्यांच्या तांत्रिक व अन्य तपासण्यांकडे दुर्लक्ष केले जात आहे. एनएमएमटी प्रशासनाबरोबरच उपप्रादेशिक कार्यालयालयाकडूनही दुर्लक्ष केले जात आहे. त्यामुळे अशा बसमधून प्रवास करण्यास केवळ प्रवासीच नव्हे तर तर वाहनचालक, वाहकसुद्धा नाखूश असतात. नवी मुंबई महापालिकेचा कायम तोट्यात असलेला उपक्रम म्हणून एनएमएमटी बससेवा ओळखली जात आहे. या सेवेची दोन टोके असून त्यात आलिशान आणि उत्तम अशी विद्युत बस सेवा आहे. तर दुसरे टोक म्हणून सीएजी आणि डिझेल बस. ज्याला खटारा बस म्हणून ओळख मिळालेली आहे. या बस गाड्यांकडे एनएमएमटी प्रशासन गांभीर्याने पाहताच नाही असा



आरोप खुद्द एनएमएमटीमध्ये काम करणारे कर्मचारी करतात. एखाद्या बसचे इंजिन उत्तम असेल तर बसवर चांगल्या प्रकारे खर्च करून उत्तम सेवा प्रवाशांना देण्याऐवजी कायमच तात्पुरती डागडुजी करून बस प्रवासी सेवेला दिली जाते. अशा बसचे टायर हा अत्यंत महत्त्वाचा मुद्दा असून महिन्यात किमान ५० वेळा तरी बस पंक्चर झाल्याच्या घटना घडतात. हे प्रमाण आसूडगाव डेपोच्या बस सेवेत जास्त आहे, असा दावा तंत्रज्ञ करतात. नवी मुंबई उपप्रादेशिक परिवहन कार्यालय अशा गाड्यांवर कारवाई कशी करत नाही हाच प्रश्न सजग प्रवाशांना पडतो. खासगी गाड्यांचा फिटनेस दरवर्षी उपप्रादेशिक परिवहन विभागाला देणे भाग असते, अशात या बसकडे का दुर्लक्ष केले जाते? या बस गाड्यांमधील अग्निसुरक्षेसाठीचे सिलिंडर बेपत्ता असून त्याचे स्टॅन्ड वाकडेतिकडे झालेले दिसतात.

# घरभाड्यापोटी ६०५ कोटींची वसुली, 'झोपु' प्राधिकरणाच्या कारवाईचा विकासकांना धसका

■ मुंबई: सम्यक कासारे

झोपडपट्टी पुनर्वसन योजनेतील रहिवाशांचे कोट्यवधी रुपये घरभाडे थकविल्याप्रकरणी झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाने कडक पावले उचलून संबंधित विकासकांविरोधात कारवाईचा बडगा उगारण्यास सुरुवात केली आहे. या कारवाईचा विकासकांनी धसका घेतला असून विकासक थकीत घरभाड्याची रक्कम, तसेच आगाऊ घरभाड्यापोटी रक्कम अदा करू लागले आहेत. त्यामुळेच झोपुने विकासकांकडून आतापर्यंत थकीत आणि आगाऊ घरभाड्यापोटी ६०५ कोटी रुपये वसूल केले आहेत.

झोपु योजनेतील पात्र रहिवाशांची झोपडी पाडल्यापासून त्याला पुनर्वसित इमारतीतील घराचा ताबा देईपर्यंत रहिवाशाला दरमहा घरभाडे देणे विकासकाला बंधनकारक आहे. मात्र या नियमांचा सर्रास भंग करत विकासक रहिवाशांच्या आर्थिक अडचणी वाढवीत असल्याच्या तक्रारी मोठ्या संख्येने समोर आल्या. या तक्रारींची दखल घेत झोपु प्राधिकरणाने २०२२ मध्ये घरभाड्याच्या थकीत रकमेचा आढावा घेतला असता १५० विकासकांनी ८८० कोटी ९३ लाख ०२ हजार ६०८ रुपये थकविल्याची बाब निदर्शनास आली. पश्चिम उपनगरांतील सर्वाधिक ८५ प्रकल्पांतील विकासकांनी ६१८ कोटी ०९ लाख ८८ हजार १०० रुपये घरभाडे थकविले आहे. तर पूर्व उपनगरांतील ४९ प्रकल्पांतील विकासकांनी १६१ कोटी ४६ लाख २७ हजार ८२८ रुपये आणि मुंबई शहरातील विकासकांनी १०१ कोटी ३६ लाख ८६ हजार ६८० कोटी रुपये थकविल्याचेही निदर्शनास आले. या थकीत घरभाड्याची गंभीर दखल घेऊन झोपु प्राधिकरणाने या विकासकांवर नोटिसा बजावत थकीत रक्कम अदा करण्याचे आदेश दिले. तसेच घरभाडे वसुलीसाठी विशेष मोहीम हाती घेतली.

विशेष मोहिमेअंतर्गत



स्वयंघोषणापत्र सादर न करणाऱ्या थकबाकीदार विकासकांना गाळ्यांची विक्री करण्यास मनाई करण्याची तरतूद करण्यात आली आहे. त्यानंतरही विकासकांनी थकीत रक्कम अदा न केल्यास महाराष्ट्र झोपडपट्टी कायद्यानुसार प्रकल्प रद्द करणे, प्रकल्प काढून घेण्याचीही तरतूद झोपु प्राधिकरणाने केली. महत्त्वाचे म्हणजे या कारवाईनंतरही विकासक पुढे आला नाही, तर त्याला थकबाकीदार म्हणून घोषित करण्याबरोबर त्याचे नाव काळ्या यादीत टाकण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. याशिवाय घरभाडे वसुलीसाठी २५ नोडल अधिकाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली आहे. घरभाडे थकीत राहू नये यासाठी २५ नोडल अधिकाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

या कारवाईनंतर अखेर विकासक जागे होत असून थकीत घरभाडे आणि आगाऊ घरभाडे अदा करण्यासाठी विकासक मोठ्या संख्येने पुढे येऊ लागल्याची माहिती झोपु प्राधिकरणातील वरिष्ठ अधिकाऱ्यांनी दिली. १५० विकासकांनी ८८० कोटी ९३ लाख ०२ हजार ६०८ कोटी रुपये थकविले आहेत. यापैकी २५१ कोटी ९३ लाख १९ हजार २७३ रुपये थकीत घरभाडे आतापर्यंत वसूल करण्यात आले आहे, तर दुसरीकडे प्राधिकरणाच्या आगाऊ घरभाड्याच्या नवीन नियमानुसार ३५३ कोटी ८६ लाख ४३ हजार ६७९ रुपये रक्कम अदा केली आहे. पश्चिम उपनगरांतील विकासकांनी १५४ कोटी ३६ लाख ३३ हजार ८४९ रुपये, पूर्व उपनगरांतील विकासकांनी १११ कोटी १० लाख ६१ हजार ४३८ रुपये, तर मुंबई शहरातील विकासकांनी ८८ कोटी ३९ लाख ४८ हजार ३९२ रुपये आगाऊ भाडे अदा केले आहे. थकीत आणि आगाऊ घरभाड्याच्या माध्यमातून 'झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाने आतापर्यंत ६०५ कोटी ७९ लाख ६२ हजार ९५२ रुपये वसूल केले आहेत.

महाराष्ट्र क्राईम टाइम्स



# राज्यात दुष्काळाचे संकट गडद; मोठ्या धरणांमध्ये ३७.९१ पाणीसाठा

■ **मुंबई: सचिन कदम**

गेल्या वर्षी राज्यात सरासरी पेक्षा पाऊस कमी झाला. यामुळे यंदा राज्यातील अनेक जिल्ह्यांध्ये पाणीटंचाईचे चित्र आहे. अनेक जिल्ह्यांध्ये सध्या पिण्यासह शेतीच्या पाण्याचा प्रश्न निर्माण झाला आहे. शेतीला पाणी नसल्याने उभे पीक करपले असून जनावरांच्या चाऱ्या पाण्याचा प्रश्न देखील गंभीर बनत आहे. यामुळे शेतकरी हवालदील झाला असून सर्वसामान्यांना पाण्याचा प्रश्न सतावत आहे. दरम्यान मार्च महिन्याच्या शेवटच्या दिवशी रविवारी राज्यातील सर्व धरणातील पाणीसाठ्यात मागील तीन दिवसात १.८५ टक्क्यांनी घट झाली आहे. तर सद्यस्थितीत राज्यातील सर्व धरणांमध्ये ३७.९१ टक्के पाणी शिल्लक आहे. हाच साठा गेल्यावर्षी याच दिवशी ४६.८३ टक्के होता. तर तीन दिवसांपुर्वी ३९. ७६ टक्के होता.

सर्व लहान मोठी अशी धरणे मिळून राज्यात सुमारे २,९९४ धरणे आहेत. यात मोठे प्रकल्प-१३८, मध्यम प्रकल्प- २६० आणि लघू प्रकल्प- २५९६ आहेत. या सर्व धरणांमध्ये मार्च महिन्याच्या शेवटच्या दिवशी ३७.९१ टक्केच पाणीसाठा शिल्लक आहे. जो तीन दिवसात सुमारे २ टक्क्यांनी घटला आहे. तर गेल्या वर्षी याच दिवशी या २,९९४ धरणांतील पाणी साठ्याची टक्केवारी ४६.८३ होती. यामुळे यंदा गेल्या वर्षीच्या तुलनेत ८.९२ टक्के पाण्याची कमतरता आहे.

राज्यातील नागपूर विभागात १६ लहान-मोठ्या धरणांची संख्या असून येथे ४८.८१ टक्के पाणीसाठा आहे. तर



गेल्या वर्षी याच दिवशी येथील धरणांमध्ये २०.५५ टक्के पाणीसाठा होता. अमरावती विभागात देखील १० धरणांची स्थिती म्हणावी तशी चांगली नसून येथे ४५.४४ टक्के पाणीसाठा आहे. तर औरंगाबाद विभागात ४४ धरणांमध्ये सध्या २१.५२ टक्के पाणीसाठा शिल्लक असून गेल्या वर्षी तो ४३.०३ टक्के होता. यामुळे येथे सद्यस्थिती दुष्काळाची गंभीर स्थिती निर्माण झाली आहे. नाशिक विभागात गेल्या वर्षी ५७.६३ टक्के पाणीसाठा होता. यात यंदा चांगलीत घट झाली असून सद्यस्थितीत येथे ३९.३३ टक्के पाणीसाठा शिल्लक आहे. पुणे विभागात देखील स्थिती गंभीर असून येथे देखील पाणीसाठ्यात गेल्या वर्षीच्या तुलनेत सुमारे १२ टक्क्यांची घट झाली आहे. गेल्या वर्षी याच दिवसात पुणे विभातील धरणांमध्ये ४७.५२ टक्के पाणीसाठा शिल्लक होता. तो यंदा ३६.६९ टक्क्यांवर आला आहे. तर कोकण विभागात ११ धरणे असून येथे ४४.७५ टक्के पाणीसाठा शिल्लक आहे. जो गेल्या वर्षीच्या तुलनेत फक्त २.६५ टक्क्यांनी कमी झाला आहे. तर राज्यातील फक्त मोठ्या धरणांचा विचार केल्यास १३८ धरणांमध्ये ३७.५५ टक्के पाणीसाठा शिल्लक असून गेल्यावर्षी तो ४५.५४ टक्के होता. गेल्या वर्षी पाऊस सरासरीपेक्षा कमी झाल्याने धरणातील पाण्याच्या साठ्यात म्हणावी तसी वाढ झालेली नाही. उलट तापमानात वाढ झाल्याने धरणातील पाणीसाठ्याने तळ गाठला आहे. यामुळे राज्यातील अनेक गावांना टँकरने पाणीपुरवठा करावा लागत आहे.

## महाराष्ट्रात एप्रिल, मे महिन्यात पंतप्रधान मोदींच्या सभांचा धडाका

■ **नवी दिल्ली: प्रगती शर्मा**

पुन्हा एकदा जागतिक पटलावर लोकशाही राष्ट्र अशी ओळख असणाऱ्या महाराष्ट्रात या लोकशाहीचा जागर पाहायला मिळत आहे. लोकसभा आणि विधानसभा निवडणुकांचं वर्ष म्हणून २०२४ या वर्षाकडे देशातील जनता आणि नेतेमंडळी मोठ्या महत्त्वाकांक्षेनं पाहत आहेत. अशा या महाराष्ट्राचं देशाच्या राजकारणात अतीव महत्त्वाचं स्थान आहे. देशाची आर्थिक राजधानी स्थिरावलेल्या याच महाराष्ट्रात खुद्द पंतप्रधान नरेंद्र मोदीसुद्धा लक्ष देताना दिसत आहेत. लोकसभा निवडणुकीचं वर्ष सुरु झाल्यापासूनच पंतप्रधानांनी राज्यातील काही महत्त्वपूर्ण प्रकल्पांचं लोकार्पण केलं, तर कैक ठिकाणी सभांना हजेरी लावली. येत्या काळातही निवडणुकांच्या रणधुमाळीत सातत्यानं पंतप्रधान मोदी



महाराष्ट्रात हजेरी लावताना दिसणार आहेत. उपलब्ध माहितीनुसार एप्रिल आणि मे महिन्यात राज्यात पंतप्रधान मोदींच्या सभांचा धडाका पाहायला मिळणार आहे. एप्रिल आणि मे महिन्यात राज्यात मोदींच्या १० सभा होणार आहेत. महाराष्ट्रात महायुतीच्या प्रचारासाठी मोदींच्या सभेचा धडाका लावला जाणार आहे. निवडणुकीसाठीच्या प्रचारासाठी जवळपास १० सभांचं नियोजन राज्यभरात करण्यात येणार आहे. लवकरच या सभांच्या तारखा जाहीर होणार असून, या सभा कुठे घेतल्या जाणार आहेत तेसुद्धा कळणार आहे. फक्त पंतप्रधान मोदीच नव्हे, तर राज्यात अमित शाह, योगी आदित्यनाथ यांच्याही सभा होणार आहेत. महाराष्ट्रात तब्बल ४५ प्लस अर्थात ४५ हून जास्त खासदार निवडून आणण्याचं उद्दिष्ट महायुतीनं ठेवल्यामुळंच या सभांचं सत्र येत्या काळात राज्य दणाणून सोडणार आहे.

## केसरकरांना पिस्तूल जमा करण्याचे आदेश, सावंतवाडीतील २५० परवानाधारकांपैकी केवळ १३ जणांना नोटीसा

■ **सावंतवाडी : सतिश सोनावणे**

निवडणूक काळात परवानाधारक शस्त्रे जमा करण्याचे आदेश सिंधुदुर्ग जिल्हाधिकाऱ्यांनी दिले आहेत. सावंतवाडी तालुक्यातील सुमारे अडीचशे परवानाधारकांपैकी केवळ तेरा जणांना याबाबत नोटीसा देण्यात आल्या असून यात शालेय शिक्षणमंत्री दीपक केसरकर यांचेही नाव आहे.

जिल्हाधिकारी किशोर तावडे यांनी काढलेल्या आदेशानुसार, जामिनावर मुक्तता झालेल्या, गुन्हेगारी पार्श्वभूमी असलेल्या आणि कोणत्याही वेळी, खास करून निवडणूक कालावधीमध्ये दंगलीत समावेश असलेल्या व्यक्तींना शस्त्रे पोलीस ठाण्यात जमा करण्याबाबत कळविण्यात आले आहे. तालुक्यातील १३ जणांची यादीमध्ये नावे असून सर्वात शेवटचे नाव दीपक केसरकर यांचे आहे. त्यामुळे आता नेमक्या कोणत्या कारणासाठी त्यांना



नोटीस बजावण्यात आली आहे, अशी शंका उपस्थित झाली आहे. एखाद्या दंगलीत समावेश होता, की गुन्हेगारी पार्श्वभूमी आहे, की एखाद्या प्रकरणात जामीनावर मुक्तता झाल्यामुळे त्यांचे नाव यादीत आहे, असे अनेक प्रश्न विचारले जात आहेत. मंत्री केसरकर यांच्याशी संपर्क साधण्याचा प्रयत्न केला असता संपर्क होऊ शकला नाही.

## खैरेंसह महायुतीचं टेन्शन वाढणार, माजी आमदार लोकसभेच्या रिंगणात, मराठा मतं मिळवण्याचा दावा

■ **मुंबई: माधव अलवा**

छत्रपती संभाजीनगर : सर्वसामान्य मराठा समाजाला आरक्षणात न्याय मिळालेला नाही. इम्तियाज जलील आणि चंद्रकांत खैरे यांच्या मतांमध्ये मागील निवडणुकीच्या तुलनेत घट होणार आहे. तीनशे गावांनी माझ्या उमेदवारीसाठी सह्यांची मोहीम राबविली आहे. त्यामुळे अपक्ष निवडणूक लढविण्याचा निर्णय घेतला आहे, असे माजी आमदार हर्षवर्धन जाधव यांनी रविवारी जाहीर केले.

औरंगाबाद लोकसभा मतदारसंघात महाविकास आघाडीचे उमेदवार चंद्रकांत खैरे आणि एमआयएमचे उमेदवार इम्तियाज जलील यांची उमेदवारी जाहीर झाली आहे. दोन दिवसात महायुतीच्या उमेदवाराची घोषणा होणार आहे. ही तिरंगी लढत होणार असतानाच माजी आमदार हर्षवर्धन जाधव यांनी अपक्ष लढणार असल्याचे जाहीर केले. त्यामुळे ही लढत चौरंगी



होण्याची चिन्हे आहेत. 'मराठा आरक्षणासाठी ज्यांनी काम केले त्यांना पाठिंबा द्या आणि ज्यांनी काम केले नाही त्यांना पाडा असा सूचक संदेश मनोज जरांगे यांनी दिला आहे. मराठा आरक्षणाच्या मुद्द्यावर राजीनामा देणारा मी एकमेव आमदार आहे. मागील लोकसभा निवडणुकीत इम्तियाज जलील यांना तीन लाख ८० हजार मते, खैरे यांना तीन लाख ७० हजार आणि मला दोन लाख ८० हजार मते मिळाली होती.', असे जाधव यांनी सांगितले. 'आता वंचित बहुजन आघाडी एमआयएमसोबत नाही. शिवसेनेतील फुटीमुळे खैरे यांची मते घटली आहेत. या परिस्थितीत माझ्या मतदानात वाढ होणार आहे. तीनशे गावांनी सह्यांची मोहीम राबवून जरांगे यांच्याकडे माझे नाव सुचविले आहे. लोकांचा पाठिंबा वाढत असल्यामुळे निवडणूक लढवण्याचा निर्णय घेतला आहे', असेही हर्षवर्धन जाधव म्हणाले. जिल्ह्यातील प्रमुख कार्यकर्त्यांशी चर्चा करून जाधव यांनी निवडणुकीच्या नियोजनास सुरुवात केली आहे.

## मनसे-भाजपची युती अडलीय कुठे? दोन्ही पक्षातील अनेकांना आश्चर्याचा धक्का, भाजपचं काय ठरलं?

■ **मुंबई: विशाल कारंडे**

भारतीय जनता पक्ष आणि महाराष्ट्र नवनिर्माण सेना यांच्यात युती होणार, मनसेचा समावेश महायुती होणार अशा चर्चांना अचानक ब्रेक लागला. मनसेप्रमुख राज ठाकरे दोन आठवड्यांपूर्वी अमित ठाकरेंसह दिल्लीला जाऊन आले. त्यांनी केंद्रीय गृहमंत्री आणि भाजप नेते अमित शहांची भेट घेतली. यानंतर ठाकरे मुंबईत परतले. त्यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याशी चर्चा केली. पण त्यानंतर मनसे महायुतीत जाणार असल्याच्या चर्चा एकाएकी थांबल्या. राज ठाकरे आणि अमित शहांची बैठक सकारात्मक झाल्याचं दोन्ही पक्षांकडून सांगण्यात आलं. पण भाजप-मनसेनं अद्याप तरी युती जाहीर केलेली नाही. सध्याच्या घडीला महायुतीत तीन पक्ष आहेत. त्यांच्यात जागावाटपावरुन बरीच रस्सीखेच सुरू आहे. त्यामुळे नवी युती करण्यापूर्वी भाजपनं आस्तेकदम धोरण स्वीकारलं आहे. आधी जागावाटप निकाली लावू आणि मग मनसेसोबत युतीचा निर्णय घेऊ, असा पवित्रा भाजपनं घेतला आहे. भाजपमधील सुत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, मनसेनं सुरुवातीला लोकसभेच्या दोन जागांची मागणी केली होती. दक्षिण मुंबई आणि शिर्डीच्या जागेसाठी मनसे आग्रही आहे. पण शिर्डीतून मुख्यमंत्री एकनाथ शिंदेंनी त्यांचा उमेदवार घोषित केला आहे. तर दक्षिण मुंबईच्या जागेसाठी भाजप, शिवसेनेत रस्सीखेच सुरू आहे. या वाटाघाटी पूर्ण झाल्याशिवाय भाजप मनसेसोबत युती जाहीर करण्यास उत्सुक नाही. युतीची चर्चा थांबल्यानं दोन्ही



पक्षांमधील नेत्यांना आश्चर्याचा धक्का बसला आहे. राज ठाकरे दिल्लीला जाण्यापूर्वी त्यांच्या देवेंद्र फडणवीसांसोबत बैठका झाल्या. पण आता अचानक हा विषय थंड बस्त्यात गेला आहे. दुसरीकडे राष्ट्रीय समाज पक्षाच्या महादेव जानकरांबद्दल भाजपनं अतिशय पटकन निर्णय घेतला. शरद पवारांच्या भेटीला गेलेल्या, त्यांच्यासोबत माढ्यासाठी बोलणी करणाऱ्या जानकरांना महायुतीत राखण्यात भाजपला यश मिळालं. त्यांच्यासाठी महायुतीनं परभणीची जागा सोडली.

## विवाहबाह्य संबंध हा गुन्हा नाही; राजस्थान उच्च न्यायालय

■ **जयपुर: वृत्तसंस्था**

लग्न झाल्यानंतर महिला किंवा पुरुषांनी स्वेच्छेने ठेवलेले विवाहबाह्य शरीर संबंध हा कायदेशीर गुन्हा नाही. असा निर्णय राजस्थान उच्च न्यायालयाने दिला आहे. न्यायमूर्ती बीरेंद्र कुमार यांनी असं म्हटलं आहे की भारतीय दंड संहिता कलम ४९७ नुसार विवाहबाह्य संबंध व्याभिचाराचा गुन्हा या कक्षेत येत होते. मात्र २०१८ मध्ये सर्वोच्च न्यायालयाने असंवैधानिक ठरवत ही बाब रद्द केली आहे. 'विवाह झालेली व्यक्ती स्वेच्छेने विवाहबाह्य संबंध ठेवत असेल तर तो कुठलाही गुन्हा नाही. व्याभिचाराचा गुन्हा आधीच रद्द करण्यात आला आहे.' एका प्रकरणाच्या सुनावणी दरम्यान न्यायालयाने हे स्पष्ट केलं आहे.



राजस्थान उच्च न्यायालयात एका याचिकेवर सुनावणी सुरु होती. यामध्ये याचिकाकर्त्याने भारतीय दंड संहिता कलम ३६६ (अपहरण किंवा महिलेला लग्नासाठी भाग पाडणं) या प्रकरणावरची ही सुनावणी होती. माझ्या पत्नीला तीन जणांनी पळवून नेलं असं याचिकाकर्त्याने म्हटलं होतं. याचिकाकर्ता या प्रकरणाच्या सुनावणीला उपस्थित राहू शकला नाही कारण तो तुरुंगात आहे. मात्र त्याची पत्नी न्यायालयात आली. तिने हे सांगितलं की ज्याच्यावर आरोप लावला गेला आहे त्या आरोपीसह मी लिव्ह इन रिलेशनशिपमध्ये राहते आहे. त्यानंतर सर्वोच्च न्यायालयाने अशा प्रकरणांमध्ये दिलेले निर्णय तपासण्यात आले. सहमतीने विवाहबाह्य संबंध ठेवणं हे अपराध नाहीत हा निर्णय राजस्थान उच्च न्यायालयाने दिला.

## आता जागावाटपाची चर्चा २०२९ मध्येच; उद्धव ठाकरेंनी दिल्लीतून काँग्रेस नेत्यांना सुनावले

■ **मुंबई: प्रथमेश चव्हाण**

राज्यातील काँग्रेस आणि उद्धव ठाकरेंच्या शिवसेनेमध्ये सांगली आणि मुंबईतील जागावाटपावरून बिनसले आहे. ठाकरेंनी कोल्हापूरची जागा काँग्रेससाठी सोडली होती, त्या बदल्यात सांगलीच्या जागेवर परस्पर उमेदवार जाहीर केला होता. तर मुंबईतील एका जागेवरही काँग्रेसने दावा केला होता तिथेही ठाकरेंनी उमेदवार जाहीर केल्याने मविआमध्ये नाराजी निर्माण झाली होती. यावर दिल्लीतील इंडिया आघाडीच्या सभेनंतर उद्धव ठाकरे काँग्रेसच्या नेत्यांशी चर्चा करतील असे सांगितले जात होते. परंतु दिल्लीत उद्धव ठाकरेंनी आता चर्चा २०२९ लाच असे सांगत



राज्यातील काँग्रेस नेत्यांना पुन्हा एकदा धुडकावून लावले आहे. जागावाटपाबाबत जे काही व्हायचे होते ते होऊन गेले. आता यामध्ये काहीही उरलेले नाही. आता आघाडीमध्ये जागावाटपाची जी चर्चा होईल ती २०२९ ला होणार, असे उद्धव ठाकरे दिल्लीत प्रसारमाध्यमांना म्हणाले आहेत. महाविकास आघाडीमध्ये जागा वाटपावरून काही वाद नाही. आदा उमेदवारांची नावे जाहीर झाल्यानंतर काँग्रेसलाही समजले आहे, असे ठाकरे म्हणाले. राहुल गांधी किंवा खर्गे यांच्याशी चर्चा करण्याची काही गरज नाहीय. आघाडी-युतीमध्ये शेवटपर्यंत जागावाटपावरून दावे-प्रतिदावे सुरु राहतात.

## भाजपा ३७० जागा कशा जिंकणार? नितीन गडकरींनी मांडलं लोकसभेचं गणित; म्हणाले, 'आमच्या संघटनेने...'

■ **मुंबई: विशाल कारंडे**

देशभरात लोकसभा निवडणुकीचे पडघम वाजू लागले आहेत. देशभरातील सर्वच पक्ष निवडणुकीच्या प्रचाराच्या कामात गुंतले आहेत. देशातील सत्ताधारी भारतीय जनता पार्टीने यंदाच्या निवडणुकीत 'अब की बार ४०० पार' असा नारा दिला आहे. भाजपाने दावा केला आहे की, यंदाच्या लोकसभा निवडणुकीत भारतीय जनता पार्टी ४०० हून अधिक जागा जिंकेल. परंतु, ४०० हून अधिक जागा जिंकणं हे अत्यंत कठीण काम आहे. त्यामुळे अनेक राजकीय विश्लेषक, राजकीय रणनीतिकारांच्या मते ४०० हून अधिक जागा जिंकणं शक्य नाही. भारतात लोकसभेच्या एकूण ५४३ जागा आहेत. सरकार स्थापन करण्यासाठी २७२ जागा जिंकणं आवश्यक असतं. २०१९ च्या लोकसभा निवडणुकीत भारतीय जनता पार्टीने ३०३ जागा जिंकल्या होत्या. तर भाजपाच्या मित्रपक्षांनी (एनडीएतीत



घटकपक्षांनी ५१ जागा जिंकल्या होत्या. एनडीए यंदा ४०० पारची घोषणा करत आहे. तर भाजपातील अनेक नेत्यांनी दावा केला आहे की, एकटी भाजपा ४०० पैकी ३७० जागा जिंकेल. केंद्रीय रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांनादेखील भाजपा ३७० हून अधिक जागा जिंकेल असं वाटतंय. गडकरी यांनी काही वेळापूर्वी नागपूर येथील त्यांच्या निवासस्थानी प्रसारमाध्यमांशी बातचीत केली. यावेळी ते म्हणाले, यंदा आम्ही दक्षिण भारतात मोठ्या प्रमाणात जागा जिंकणार आहोत. गडकरी म्हणाले, 'गेल्या १० वर्षांमध्ये आमच्या सरकारने खूप चांगली आणि मोठ्या प्रमाणात कामं केली आहेत. त्यामुळे एनडीएला ४०० हून अधिक जागा मिळतील.' विरोधी पक्षांबाबत गडकरी म्हणाले, 'केवळ सरकारवर आरोप करण्याशिवाय विरोधकांनी लोकांचा विश्वास जिंकण्यासाठी काहीतरी करायला हवं.' गडकरी यंदा नागपुरातून तिसऱ्यांदा लोकसभा निवडणूक लढवत आहेत.

नितीन गडकरी म्हणाले, गेल्या १० वर्षांमध्ये आमच्या सरकारने ईशान्य भारतात खूप कामं केली आहेत. त्याचे चांगले परिणाम आम्हाला आतापासूनच दिसत आहेत. तसेच आमच्या कार्यकर्त्यांनीदेखील त्या भागात जनसंपर्क वाढवला आहे. त्या भागात आमचा पक्ष आता मजबूत झाला आहे.

## नववधूला होळीचा सण देऊन परतणाऱ्या डॉक्टरासह आईचा अपघातात मृत्यू, २० दिवसांवर होते लग्न

■ **मुंबई: राकेश गायकवाड**

घरात लग्नाची तयारी सुरु होतीष्ठअवघ्या २० दिवसांवर लग्न होतेष्ठलग्न ठरलेल्या नववधूला होळीचा सण देण्यासाठी कुटुंब इंदूरला गेले होतेष्ठत्या ठिकाणी डॉक्टर वर आणि नववधूची भेट झालीष्ठदोन्ही जण लग्नाच्या स्वप्नात होते. परंतु काळाने त्यांची स्वप्न उद्धवस्थ केली. आई-वडिलासह इंदूरवरुन परत येताना त्यांच्या कारचा अपघात झाला. त्यात डॉक्टर निलेश माळोदे आणि त्याच्या आईचा मृत्यू झाला. अपघातात त्याचे वडील गंभीर जखमी झाले आहे. त्यांना रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. बाळापूर येथील रहिवासी रामराव माळोदे यांचा मुलगा दंत शल्य चिकित्सक डॉ. निलेश माळोदे याचा विवाह इंदूर येथील एका मुलीशी ठरला



होता. नववधूला होळीचा सण देण्याकरिता रामराव लक्ष्मण माळोदे, डॉ. निलेश माळोदे आणि सौ. संगीता रामराव माळोदे हे तिघे जण कारने इंदूर येथे गेले होते.

पान १ वरुन...

### गेल्या १० वर्षात...

बँकांचा ग्रॉस एनपीए २०१८ मध्ये सव्वा अकरा टक्क्यांपर्यंत पोहोचला होता. तो आता २०२३ पर्यंत आता तीन टक्क्यांपर्यंत खाली आला आहे. बँकिंग क्रेडिट ग्रोथ १५ टक्क्यांपर्यंत पोहोचली आहे. आरबीआयची यात मोठी भूमिका आहे आणि ते अभिनंदनास पात्र आहेत.

भारतीय अर्थव्यवस्था नवे किर्तीमान रचतेय

भारताची प्रगती वेगाने व्हावी आणि इन्क्लुझिव्ह व्हावी यासाठी आरबीआयला पाऊलं उचलावे लागतील. आरबीआय विविध क्षेत्राला लागणाऱ्या गरजांसंदर्भात भूमिका आरबीआयनं घ्यावी, बँकांना मदत करावी, सरकार आरबीआयसोबत आहे. महागाई कमी व्हावी, यासंदर्भात आधी धोरण व्यवस्थित नव्हतं, मात्र पतधोरण समितीनं त्यावर काम केलं. कोरोना आणि युद्धात देखील महागाई दर आटोक्यात आपण ठेवला. ज्यांचे व्हिजन व्यवस्थित आहे, त्यांची प्रगती होण्यापासून कोणी रोखू शकत नाही. जगातील मोठे-मोठे देश कोरोनातून बाहेर येण्याचा प्रयत्न करतायत, त्याच भारतीय अर्थव्यवस्था नवे किर्तीमान स्थापित करत आहे. आरबीआय भारताचा वैश्विकस्तरावर घेऊन जाऊ शकतं, असं पंतप्रधान मोदी म्हणाले.

### निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर...

एलपीजी सिलिंडर कोलकात्यात ३२ रुपयांनी, मुंबईत ३१.५० रुपयांनी आणि चेन्नईमध्ये ३०.५० रुपयांनी स्वस्त झाला आहे. केवळ व्यावसायिक सिलिंडरमध्ये एलपीजीचे दर कमी करण्यात आले आहेत. या महिन्यात घरगुती सिलिंडरच्या किंमतीत कोणताही बदल झालेला नाही.

छ्दण नुसार, दिल्लीत आजपासून १९ किलोचा थ्क्ष्उ सिलेंडर १७६४.५० रुपयांना मिळणार आहे. पूर्वी तो १७९५ रुपये मिळत होता. कोलकाता येथे आता १९११ रुपयांऐवजी १८७९.०० रुपयांना मिळेल. मुंबईत १७१७.५० रुपये झाला आहे, पूर्वी तो १७४९ रुपये होता. चेन्नईमध्ये व्यावसायिक एलपीजी सिलिंडर आता १९३०.०० रुपयांना मिळणार आहे. सरकारी तेल कंपन्यांनी दिलेल्या माहितीनुसार, आजपासून देशातील विविध शहरांमध्ये एलपीजी सिलिंडरच्या किंमतीत ३०.५० रुपयांपर्यंत कपात करण्यात आली आहे. मात्र, या कपातीचा लाभ केवळ १९ किलोच्या व्यावसायिक एलपीजी सिलिंडरवरच मिळणार आहे. घरगुती वापराच्या एलपीजी सिलिंडरच्या किमतीत यावेळी कोणताही बदल करण्यात आलेला नाही.

### 'मॅचफिक्सिंग'सारखी भाजपने...

झारखंडचे माजी मुख्यमंत्री हेमंत सोरेन यांना केलेली अटक हा लोकशाहीवरील हल्ला आहे, असेही गांधी म्हणाले. ते पुढे म्हणाले की, मीडियावर दबाव आणला जात आहे. नेत्यांना धमकी दिली जात आहे पैशांची वापर करून सरकार पाडली जात आहेत. पण तुम्ही भारताचा आवाज दाबू शकत नाही. ऐन निवडणुकीत काँग्रेसची बँक खाती गोठवली आहेत. त्यामुळे प्रचारासाठी पैसे नाहीत, पोस्टर लावायलाही आमच्याकडे पैसे नाहीत. देशाला धमकावून सरकार चालवलं जाऊ शकत नाही. भ्रष्टाचाराला संपविण्यासाठी इंडिया आघाडी लढत आहे. संविधान वाचविण्यासाठी आमची लढाई सुरू आहे.

### मनोज जरांगे पाटील अखेर...

समाजाची हानी होईल, असं सांगतानाच राहिलेले आरक्षण द्यायला मी खंबीर आहे, असं मनोज जरांगे पाटील म्हणाले. मराठा समाजाने कुणाच्याही प्रचाराला जायचे नाही. बारकाईने लक्ष ठेवायचे आहे. आता करेक्ट कार्यक्रम करायचा आहे. आम्हाला जे लागते ते द्या. मग तुम्ही उताणे पडा किंवा सरळ पडा, त्याच्याशी आम्हाला काहीही घेणंदेणं नाही. आम्हाला राजकारणाशी काही देणे घेणे नाही, असं मनोज जरांगे यांनी म्हटलंय. मी कुणाला मतदान करा म्हणणार नाही. पण जे आरक्षणाच्या बाजूने आहे त्यांनाच मतदान करायचे आहे. कुणाला पाडायचं हे आता मराठ्यांनी ठरवायचं आहे, असंही ते म्हणाले. उद्यापासून विधानसभेच्या तयारीला लागायचं आहे. आम्ही ११२ पेक्षा अधिक विधानसभेच्या जागा लढवणार आहोत, अशी घोषणा करतानाच तुम्ही काहीच करत नाहीत आणि तुम्हीच आम्हाला राजकारणात ढकलत आहात. ही वेळ तुम्हीच आमच्यावर आणली आहे, असंही जरांगे यांनी म्हटलंय.

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यावर आमची खूप माया होती. ते कोणत्या पक्षातून कुठे गेले याच्याशी मराठ्यांना काहीच घेणंदेणं नव्हते आणि नाही. शिंदे साहेबच आम्हाला आरक्षण देतील असं आम्ही म्हणायचो. पण ते मराठ्यांच्या मनातून उतरले आहेत. देवेंद्र फडणवीस यांना मी सहा महिने काहीच बोललो नाही. ते गुन्हे दाखल करत आहेत, असा आरोपही त्यांनी केला.

# लोणावळ्यातील बंगल्यात अश्लील चित्रफिती बनविणाऱ्या टोळीचा पर्दाफाश

■ **पुणे: विशेष प्रतिनिधी**

लोणावळा येथील एका बंगल्यात संगनमताने अश्लील, नग्न व बीभत्स चित्रफिती बनविणाऱ्या १० पुरुष आणि ५ महिलांच्या टोळीचा लोणावळा ग्रामीण पोलिसांनी पर्दाफाश केला. पोलिसांनी टाकलेल्या छाप्यात आरोपी स्वतःचे अश्लील चित्रीकरण विविध अवैध वेबसाईटस तसेच मोबाईल अॅप्लिकेशनवर अपलोड करून प्रसारीत करीत असल्याचे समोर आले. या कारवाईत अश्लील चित्रफीत बनविणाऱ्या १५ जणांसह त्यांना बंगला भाड्याने देणाऱ्या तीन जणांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. कारवाईत दोन कॅमेरे आणि इतर साधने असा ६ लाख ७२ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

लोणावळा विभागाचे उपविभागीय पोलीस अधिकारी सत्यसाई कार्तिक यांनी याबाबत माहिती दिली. विष्णू मुन्नासाहब साओ (वय- ३०, रा. १६ परगणा, कोलकाता), जावेद हबीबुल्ला खान (वय- ३५, रा. आहरा उमरी, जि. बस्ती, उत्तर प्रदेश), बुद्धसेन बरदानीलाल श्रीवास (वय- २९, रा. महाकाली कॉलनी, चंद्रपूर), समीर मेहताब आलम (वय- २६, रा. अमरोहा, राईड मॉक्सी, उत्तर प्रदेश), अनुप मिथिलेश चौबे (वय- २९, रा. काशीबाई चाळ, कांदिवली ईस्ट, मुंबई), रामकुमार श्रीभगवान यादव (वय- २१, रा. रोनक सिटी, श्याम कॉलनी, हरियाणा), राहुल सुरेश नेवरेकर (वय- ३८, रा. मोहनचाळ, वागळे इस्टेट, ठाणे), अनिकेत पवन शर्मा (वय- १९, रा. रुद्राक्ष रेसिडेन्सी, पलसाना,सुरत , गुजरात), वंशज सचिन वर्मा (वय- २१, रा. डेहराखास, डेहराडून), मनीष हिरामण चौधरी (वय- २०, रा. शास्त्रीनगर, हरियाणा) यांच्यासह पाच महिला आणि



बंगला चालक सुखदेव चांगदेव जाधव (वय- ५२), आकेश गौतम शिंदे (वय - ३२) व सनी विलास शेंडगे (वय- ३५, तिघे रा. मळवली, ता. मावळ) अशी गुन्हा दाखल केलेल्यांची नावे आहेत. याबाबत लोणावळा ग्रामीण ठाण्याचे फौजदार भारत भोसले यांनी फिर्याद दिली आहे. मळवली येथील स्थानिक आरोपी सुखदेव जाधव, आकेश शिंदे व सनी शेडगे यांनी हा बंगला इतर आरोपींना ३० हजार रुपये भाडेतत्त्वावर दिला होता. बंगल्यात इतर आरोपींकडून अश्लील, नग्न व बीभत्स चित्रफिती बनविल्या जात असल्याचो माहीत असतानाही तिघांनी याबाबत पोलिसांना कोणतीही माहिती दिली नाही. उलट भाड्यापोटी २० हजार रुपये आगाऊ रक्कमही घेतली. बंगल्यात अश्लील चित्रीकरण करीत असल्याची माहिती लोणावळा ग्रामीण पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक किशोर धुमाळ यांना मिळाली. पोलिसांच्या पथकाने बंगल्यावर छापा टाकला. यावेळी बंगल्यात १३ पुरुष आणि पाच महिला आढळून आल्या. पुणे ग्रामीण पोलीस अधीक्षक पंकज देशमुख, अपर पोलीस अधीक्षक रमेश चोपडे, उपविभागीय पोलीस अधिकारी सत्यसाई कार्तिक यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक किशोर धुमाळ, फौजदार भारत भोसले, सागर अरगडे, सहायक फौजदार अजय दरेकर, महेंद्र वाळुंजकर, युवराज बनसोडे, हवालदार बाळकृष्ण भोईर, दुर्गा जाधव, पुष्पा घुगे, कोहिनकर, सागर धनवे, सूरज गायकवाड आदींनी कारवाईत सहभाग घेतला.

# अभिनेता अनू कपूरसह ६०० गुंतवणूकदारांची फसवणूक करणारा अटेकत

■ **मुंबई: विशेष प्रतिनिधी**

गुंतवणुकीवर चांगला परतावा देण्याच्या नावाखाली गुंतवणूकदारांची ३८० कोटी रुपयांची फसवणूक करणाऱ्या अंबर दलालचा गेल्या १२ दिवसांपासून पाठलाग केला जात होता. मुंबईतून पळून गेल्यानंतर आरोपी गुजरात, राजस्थान आणि उत्तराखंड या राज्यात राहत होता. आरोपींनी सुमारे १००० गुंतवणूकदारांची फसवणूक केल्याचा संशय आहे. आतापर्यंत ६०० तक्रारदार पोलिसांकडे आले आहेत. त्यात अभिनेता अनु कपूरचाही समावेश आहे. डझनभर गुंतवणूकदारांची ५४ कोटी रुपयांची फसवणूक केल्याप्रकरणी ओशिवरा पोलिसांनी १५ मार्च रोजी रिट्झ कन्सल्टन्सी सर्व्हिसेस कंपनीचे मालक दलाल यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल केला होता. जुहू येथील फॅशन डिझायनर बबिता मलकानी यांच्या तक्रारीवरून पोलिसांनी या प्रकरणी गुन्हा दाखल केला होता. याप्रकरणी तक्रारदारांची संख्या वाढली आहे. त्यामुळे फसवणुकीचे प्रमाणन ३८० कोटी रुपयांपर्यंत वाढले आहे. आतापर्यंत ६०० तक्रारदार पोलिसांकडे आले आहेत.

तक्रारीनुसार, एप्रिल २०२३ मध्ये



एका मित्राने तक्रारदार महिलेची अंबर दलालशी ओळख करून दिली. त्याने तिला गुंतवणुकीवर आकर्षक परतावा देऊ केला. तसेच दरमहा १.५ ते १.८ टक्के परतावा देण्याचे आश्वासन दिले आहे. गुन्हा दाखल होण्याच्या एक दिवस आधी १४ मार्च रोजी अंबर दलाल फरार झाला होता. जुहू, अंधेरी, दहिसर परिसरात पोलिसांनी त्याचा शोध घेतला. मात्र तोपर्यंत दलाल गुजरातला पळून गेला होता. त्याच्या मागावर पोलिसांचे पथक गुजरातला गेले. काही दिवस गुजरातमध्ये राहिल्यानंतर आरोपी राजस्थानला पळून गेले. तेथून तो उत्तराखंडला पळून गेला. या काळात त्यांनी सहा हॉटेलमध्ये मुक्काम केला होता. पोलिसांपासून वाचण्यासाठी आरोपी एका छोट्या हॉटेलमध्ये थांबला होता. अखेर वरिष्ठ पोलीस निरीक्षक सचिन कदम, पोलीस निरीक्षक पांडुरंग गवते यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस पथक आरोपीच्या मागावर उत्तराखंडला गेले. चार दिवस तेथे तळ ठोकल्यानंतर पोलिसांनी आरोपी दलालाला तेथील तपोवर परिसरातून अटक केली. सलग १२ दिवस आरोपींची माहिती घेतल्यानंतर मुंबई पोलिसांनी स्थानिक पोलिसांच्या मदतीने त्याला अटक केली. याप्रकरणी आतापर्यंत २० बँक खाती गोठवण्यात आली आहेत. याप्रकरणी पोलिसांनी ३६ बँकांशी संपर्क साधून आरोपींच्या बँक खात्यांची माहिती मागवली आहे.

# रस्त्यावर महिलांची छेड काढणाऱ्याच्या मुसक्या आवळणार -पोलीस आयुक्त अमितेश कुमार

■ **पुणे: विशेष प्रतिनिधी**

रस्त्यावर घडणारे गुन्हे रोखणे ही आमची प्राथमिकता आहे. रस्त्यावर गुन्हे करणाऱ्यांवर कडक कारवाई करणार आहे. रस्त्यावरुन जाणाऱ्या महिलांची छेड काढणाऱ्या तसेच सिग्नलवर झालेल्या वादातून रस्त्यावर मारहाण करणे, गाड्यांची तोडफोड करणरे, अशा प्रकारचे सार्वजनिक ठिकाणी गुन्हे करणाऱ्यांविरुद्ध कडक कारवाई केली जाईल, असा इशारा पुणे पोलीस आयुक्त अमितेश कुमार यांनी दिला आहे.

निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर ज्यांचे क्रिमीनल रेकॉर्ड आहे अशा गुन्हेगारांची यादी तयार करण्यात आली आहे. जे गुन्हेगार एमपीडीए मधून बाहेर आले असतील, गुन्ह्यात फरार आहेत, जामीनावर बाहेर आले आहेत, ज्यांच्यावर कारवाईचे आदेश निघाले असतील अशा गुन्हेगारांची यादी तयार करुन त्यांची धरपकड सुरु करण्यात आली आहे. निवडणुकीच्या अनुषंगाने कोणावर कोण कोणत्या कायद्यांतर्गत पुढील दोन महिन्यात प्रतिबंधात्मक कारवाई करायची याची देखील लिस्ट तयार करण्यात आली आहे. निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर बंदोबस्त ठेवण्यात येत आहे. काही भागात पेट्रोलींग वाढवण्यात आली आहे. निवडणुकीच्या दृष्टीने ज्या काही उपाय योजना करायच्या आहेत त्या करण्यात येत आहेत. शहरातील पब्स आणि रेस्टॉरंटला रात्री दीड वाजेपर्यंत परवानगी दिली आहे. मात्र, याचे उल्लंघन करणाऱ्यावर कडक कारवाई करण्यात येत आहे.



याशिवाय रस्त्याच्या कडेला खाद्य पदार्थ विक्री करणाऱ्यांना साडे अकरा वाजेपर्यंतची वेळ देण्यात आली आहे. त्यानंतर खाद्य पदर्थ विक्री करताना आढळून आल्यास त्यांच्यावर कडक कारवाई करण्यात येणार आहे पुण्यात दारुच्या दुकानाबाहेर अंडा बुर्जी तसेच चायनीज गाड्यांवर दारुचे सेवन केले जात असल्याचे दिसून आले आहे. वाईन शॉपच्या समोर आणि आसपासच्या गाड्यांवर दारू पिणाऱ्यावर कारवाई करण्याची मोहीम हाती घेण्यात आली आहे. तसेच देशी दारु विक्रीच्या दुकानांना सकाळी आठ ते रात्री दहा ही वेळ देण्यात आली आहे. मात्र, काही ठिकाणी वेळेच्या आधी आणि वेळ संपल्यानंतर देखील दुकाने सुरु ठेवली जात आहेत, अशा दुकानांवर देखील कारवाई करणार असल्याचे पोलीस आयुक्तांनी सांगितले.

# आयपीएल तिकिटांची विक्री करणारी टोळी गजाआड

■ **मुंबई: विशेष प्रतिनिधी**

बनावट वेबसाईटच्या माध्यमातून आयपीएल सामन्याच्या तिकिटांची विक्री करणाऱ्या टोळीचा दक्षिण सायबर पोलिसांनी पर्दाफाश केला. खुशल डोबरिया, भार्गव बोराड, उत्तम भिमानी, जास्मिन पिठानी, हिमंत अंताला, निंकूज



खिमानी, अरविंद चोटालिया अशी त्यांची नावे आहेत. त्या सर्वांना न्यायालयाने पोलीस कोठडी सुनावली आहे. तक्रारदार हे एका कंपनीत काम करतात. गेल्या महिन्यात त्यांच्या पंपनीची बोगस वेबसाईट तयार केली गेली. त्या पोर्टलवरून आयपीएल सामन्याची तिकीट बुकिंग होत असल्याचे भासवण्यात आले. क्रिकेटच्या सामन्याची बनावट तिकीट बनवून त्याची विक्री केली जात होती, याची माहिती कंपनीला मिळाली. हा प्रकार लक्षात येताच पंपनीने दक्षिण सायबर पोलीस ठाण्यात धाव घेतली. पोलिसांनी अज्ञात व्यक्तीविरोधात गुन्हा नोंद केला. सायबर सेल आणि गुन्हेगारी गुप्तवार्ता विभागाच्या मदतीने तपास सुरू केला. तपासादरम्यान पोलिसांनी सुरत येथून खुशलला ताब्यात घेतले. त्याच्या चौकशीत अन्य ६ जणांची नावे समोर आली. त्या ६ जणांना पोलिसांनी ताब्यात घेऊन अटक केली. उत्तमने ती बनावट वेबसाईट तयार केली होती. तसेच बनावट कागदपत्रांच्या माध्यमातून बँक खाते उघडले होते. त्या खात्यात तिकीट विक्रीचे पैसे येत होते. खात्यात आलेली ती रक्कम ते एटीएम कार्डच्या माध्यमातून काढून घेत होते, अशी माहिती तपासात समोर आली आहे. या टोळीने आतापर्यंत अनेकांची फसवणूक केल्याचे तपासात समोर आले आहे.

# आठ वर्षांच्या मुलीवर शाळेत लैंगिक अत्याचार, आरोपी शिपायाला अटक

■ **मुंबई: विशेष प्रतिनिधी**

सांताक्रुझ येथील शाळेत शिकणाऱ्या ८ वर्षांच्या विद्यार्थिनीवर शाळेतील शिपायाने लैंगिक अत्याचार केल्याचा आरोप आहे. याप्रकरणी सांताक्रुझ पोलिसांनी बलात्कार व बालकांचे लैंगिक अपराधांपासून संरक्षण कायद्या अंतर्गत गुन्हा दाखल करून आरोपी शिपायाला अटक केली आहे.

आरोपी गेल्या अनेक दिवसांपासून पीडित मुलीवर अत्याचार करत होता. त्याबाबत कोणाला सांगितल्यास तिला व तिच्या कुटुबियांना मारण्याची धमकी त्याने दिली होती. त्यामुळे पीडित मुलगी घाबरली होती. डिसेंबर २०२३ पासून पीडित मुलीवर आरोपी



शाळेतील स्टोअर रूममध्ये अत्याचार करत असल्याचे तक्रारीत म्हटले आहे. पीडित मुलीला धमकावल्यामुळे तिने हा प्रकार कुटुंबियांना सांगितला नाही. पण तिला चालताना त्रास होत असल्यामुळे कुटुंबियांना पीडित मुलीला रुग्णालयात नेले. तेथे वैद्यकीय तपासणीत तिच्यावर लैंगिक अत्याचार झाल्याचे समजले. आरोपीने पीडित मुलीला मारहाण केली व त्यानंतर धमकावून तिच्यावर वारंवार अत्याचार केला. कुटुंबियांनी याप्रकरणी तक्रार केल्यानंतर सांताक्रुझ पोलिसांनी बलात्कार, पोक्सो कायद्या अंतर्गत गुन्हा दाखल केला. त्यानंतर ३९ वर्षीय आरोपीला शाळेतून पोलिसांनी अटक केली. याप्रकरणी पोलीस अधिक तपास करत आहेत.

# मोबाईल वरून झालेल्या भांडणात महिलेचा मृत्यू; पोलिसांनी घेतले दिराला ताब्यात

■ **मुंबई: विशेष प्रतिनिधी**

मोबाईल हरवल्यावरून घरात झालेल्या भांडणात महिलेचा जीव गेल्याची घटना ऐरोलीतील साईनाथ वाडीमध्ये गुरुवारी (ता. २८) घडली. रबाळे पोलिसांनी याप्रकरणी गुन्हा दाखल केला असून महिलेच्या दिराला ताब्यात घेतले आहे. यशोदा बैत्राम्नी (वय ३३) असे मृत महिलेचे नाव आहे.




यशोदा बैत्राम्नी ही महिला ऐरोलीतील साईनाथ वाडी येथे तिच्या कुटुंबासह राहत होती. काही दिवसांपूर्वी तिचा लहान दीर विष्णू बैत्राम्नी याने तिचा मोबाईल हरवला होता. त्यामुळे आपल्याला नवा मोबाईल घेऊन दे, असा तगादा यशोदा हिने विष्णूकडे लावला होता. गुरुवारी रात्री यशोदाने त्याच्याकडे नव्या मोबाईलबाबत विचारणा केली.

त्यामुळे दोघांत बाचाबाची झाली. त्यांची भांडणे सोडवण्यासाठी यशोदा हिचा मोठा दीर गोपाळ आणि त्याची पत्नी अंजली या दोघांनी मध्यस्थी करण्याचा प्रयत्न केला; पण विष्णू याने गोपाळला मारहाण करण्यास सुरुवात केली. त्यांचे भांडण सोडवण्याचा प्रयत्न अंजली व यशोदा या दोघींनी केला; पण विष्णूने त्या दोघींनाही ढकलून दिले. यात यशोदाच्या डोक्याला जोराचा मार लागल्यामुळे ती बेशुद्ध झाली. तिला रुग्णालयात नेले असता डॉक्टरांनी तिल मृत घोषित केले. त्यामुळे विष्णूविरोधात गुन्हा दाखल झाला असून त्याला ताब्यात घेण्यात आले आहे.

# महापालिकेच्या कंत्राटदाराकडून खंडणी उकळणारी टोळी अटकेत

■ **मुंबई: विशेष प्रतिनिधी**

चुनाभट्टी परिसरात जलवाहिनी



टाकण्याचे काम करणाऱ्या पालिकेच्या कंत्राटदाराकडून खंडणी उकळणाऱ्या चौघांना शुक्रवारी चुनाभट्टी पोलिसांनी दोन तासात अटक केली. गेल्या तीन महिन्यांपासून पालिकेचा कंत्राटदार चुनाभट्टी परिसरात जलवाहिनी टाकण्याचे काम करीत आहे. या परिसरातील एका टोळीने पालिका कंत्राटदाराकडे अनेकदा खंडणी मागितली होती. मात्र त्याने खंडणी देण्यास नकार दिला होता.

कंत्राटदार शुक्रवारी परिसरात काम करीत असताना आरोपींनी त्याला अडवले आणि चाकूचा धाक दाखवून त्याच्या खिशातील दोन हजार रुपये काढून घेतले. याबाबत कंत्राटदाराने चुनाभट्टी पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली. त्यानंतर पोलिसांनी तत्काळ गुन्हा दाखल करून आकाश खंडागळे (३१), उमेश पल्ले (४०), राकेश राणे (४५) आणि ऋषीकेश भोवाळ (२२) या चौघांना अटक केली. अटक आरोपींपैकी दोघे सराईत गुन्हेगार असून यापूर्वी त्यांच्याविरोधात अनेक गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

# पत्नीला 'सेकंड हॅण्ड' म्हटल्याने न्यायालयाने पतीला ठोठावला तीन कोटींचा दंड

■ **मुंबई: विशेष प्रतिनिधी**

पत्नीला 'सेकंड हॅण्ड' म्हटल्याने न्यायालयाने पतीला तीन कोटी रुपायांचा दंड ठोठावल्याची घटना मुंबईतून उघडकीस आली आहे. पत्नीने घरगुती हिंसाचार कायद्यांतर्गत पतीविरोधात तक्रार केली होती. या प्रकरणाच्या सुनावणीदरम्यान न्यायालयाने हा निर्णय दिला. ही घटना नेमकी कधीची आहे ते स्पष्ट झालेले नाही. पत्नीच्या म्हणण्यानुसार, तिचे दुसरे लग्न असल्याने तिचा पती तिला नेहमी 'सेकंड हॅण्ड' म्हणून हिणवत होता.

फर्स्ट पोस्टने दिलेल्या वृत्तानुसार, मुंबईतील एका महिलेने तिच्या पतीविरोधात घरगुती हिंसाचाराची तक्रार दाखल केली होती. पतीकडून आपला मानसिक व शारीरिक छळ होत असल्याचे तिने या तक्रारीत म्हटले होते. तसेच



आपले दुसरे लग्न असल्याने पती नेहमी 'सेकंड हॅण्ड' म्हणून हिणवतो, असेही तिने तक्रारीत नमूद केले होते. महिलेच्या तक्रारीनंतर मेट्रोपॉलिटन मॅजिस्ट्रेट कोर्टात या प्रकरणी सुनावणी पार पडली. यावेळी न्यायालयाने आरोपी पतीने त्याच्या पत्नीला तीन कोटी रुपयांची भरपाई द्यावी, असे आदेश दिले.

दरम्यान, क्षुल्लक कारणांवरून पत्नी-पत्नी यांच्यात वाद होण्याचो प्रमाण दिवसेंदिवस वाढत आहे. काही दिवसांपूर्वीच आग्रा येथे मोमोजवरून पती-पत्नीदरम्याने भांडण झाले होते. त्यानंतर पत्नीने थेट पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली होती. खरे तर पत्नीने पतीकडे मोमोज खाण्याची इच्छा व्यक्त केली होती आणि ती इच्छा पूर्ण न केली गेल्याने दोघांमध्ये वाद झाला होता.

# लग्नास नकार दिला म्हणून तरूणीवर हल्ला, हत्येच्या प्रयत्नाचा गुन्हा दाखल

■ **मुंबई: विशेष प्रतिनिधी**

लग्नास नकार दिला म्हणून ३० वर्षीय तरूणीवर एकतर्फी प्रेम करणाऱ्याने लोखंडी सळीने हल्ला केल्याचा गंभीर प्रकार मालाड पूर्व येथे घडला. याप्रकरणी कुरार पोलिसांनी हत्येच्या प्रयत्नाचा गुन्हा आरोपीविरोधात दाखल केला आहे. आरोपी पूर्वीपासून तरूणीला त्रास देत होता. पीडित तरूणी मालाड पूर्व येथील रहिवासी असून शिक्षिका आहे. ती खासगी संगणक अभ्यासवर्गात शिकवते. आरोपी चमन ऊर्फ मोहम्मद हारून इद्रीस (२५) पीडित तरूणीवर एकतर्फी प्रेम करत होता. पीडित महिला शनिवारी अभ्यासवर्गाला जात असताना आरोपीने पीडित तरूणीला लग्नबाबत विचारले. आरोपीच्या मागणीला तिने नकार दिला असता आरोपीने हातातील लोखंडी सळीने तिच्यावर हल्ला केला. त्यात तरूणीच्या डोक्याला, डाव्या हातात व कमरेला गंभीर दुखापत झाली.




तरूणीवर शताब्दी रुग्णालयाच्या अतिदक्षता विभागात उपचार सुरू आहेत. आरोपी गेल्या अनेक दिवसांपासून तरूणीला लग्नासाठी विचारत होता. त्यावेळीही तरूणीने त्याला नकार दिला होता. आरोपी लोखंडी सळी बरोबर्वघेऊन आल्यामुळे हा हल्ला पूर्व नियोजीत होता.

# विद्यार्थ्यांचे लॅपटॉप चोरणारा डिलिव्हरी बॉय अटकेत: नऊ लॅपटॉप, मोबाइल, दुचाकी जप्त

■ **पुणे: विशेष प्रतिनिधी**

सिंहगड रस्ता, वारजे, एरंडवणे भागात विद्यार्थ्यांच्या सदनिकेतून महागडे लॅपटॉप, मोबाइल संच, स्मार्ट वॉच चोरणाऱ्या एका तरुणास अटक करण्यात आली. चोरट्याकडून नऊ लॅपटॉप, चार मोबाइल संच, दोन दुचाकी असा चार लाख ६२ हजारांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. तेजस दत्तात्रय सूर्यवंशी (वय २३, रा. नांदेड) असे अटक करण्यात आलेल्याचे नाव आहे. तेजस पुण्यात शिक्षणासाठी आला असून तो एका नामांकित कंपनीत डिलिव्हरी बॉयचे म्हणून काम करत आहे. गेल्या काही दिवसांपासून वारजे भागात विद्यार्थी राहत असलेल्या सदनिकेतून लॅपटॉप चोरीला जाण्याच्या घटनांमध्ये वाढ झाली होती. याप्रकरणाचा तपास वारजे पोलिसांकडून करण्यात येत होता. पोलिसांनी परिसरातील सीसीटीव्ही कॅमेऱ्यांनी केलेले चित्रीकरण ताब्यात घेतले होते. तांत्रिक तपासात सूर्यवंशीने लॅपटॉप चोरल्याची माहिती मिळाली. त्यानंतर पोलिसांनी सापळा लावून



सूर्यवंशीला ताब्यात घेतले. चौकशीत त्याने विद्यार्थी राहत असलेल्या सदनिकेतून लॅपटॉप, स्मार्ट वॉच, मोबाइल चोरी केल्याचे उघड झाले. सिंहगड रस्ता, वारजे, एरंडवणे भागात चोरीचे गुन्हे केल्याचे निष्पन्न झाले. त्याने नांदेड जिल्ह्यातील मुखेडमधून दुचाकी चोरल्याचे तपासात उघडकीस आले. परिमंडळ तीनचे पोलीस उपायुक्त संभाजी कदम यांच्या मार्गदर्शनाखाली वारजे पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक मनोज शेडगे, सहायक निरीक्षक रणजीत मोहिते, प्रदीप शेलार, भुजंग इंगळे, बंटी मोरे, संभाजी दराडे, विक्रम खिलारी, अजय कामठे, शरद पोळ यांनी ही कारवाई केली.

# राजकीय अस्वस्थता कायम; महायुती, महाविकास आघाडीमध्ये तणाव

■ मुंबईः प्रथमेश चव्हाण

लोकसभेच्या दुसऱ्या टप्प्यातील उमेदवारी अर्ज भरण्याची मुदत संपत आली तरीही महायुती आणि महाविकास आघाडीतील जागावाटपावरून सुरू झालेली रस्सीखेच संपण्याचे अजून नाव दिसत नाही. ठाणे, सातारा, नाशिक या जागांवरून महायुतीत तर सांगली, भिवंडी, दक्षिण मध्य मुंबई या मतदारसंघांवरून महाविकास आघाडीत तुटेपर्यंत ताणले गेले आहे. या घडामोडींमुळे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यावर मित्रपक्ष तसेच स्वपक्षीय खासदार असा दुहेरी दबाव आला आहे. या अस्वस्थेपायीच महायुती किंवा महाविकास आघाडीला अद्याप जागावाटपांची अधिकृतपणे घोषणा करता आलेली नाही.

नाशिकमध्ये आपल्याला उमेदवारी द्यावी, अशी सूचना भाजपने केल्याचा दावा छगन भुजबळ यांनी केला. तसेच ही माहिती आपल्याला उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिल्याचे सांगत भुजबळ यांनी मुख्यमंत्री शिंदे यांची अधिकच कोंडी केली आहे. नाशिकमध्ये भुजबळांना उमेदवारी दिल्यास जातीचे ध्रुवीकरण होईल, असे शिंदे गटाचे म्हणणे असून त्याचा फायदा ठाकरे गटाला होईल, असे गणित मांडले जात आहे. दुसरीकडे अधिकृत उमेदवारी जाहीर होण्यापूर्वीच हेमंत गोडसे यांनी शनिवारपासून प्रचाराला सुरुवात केली. साताऱ्यात उदयनराजे भोसले गुडघ्याला बाशिंग बांधून तयार असले तरी भाजपने त्यांची अधिकृतपणे उमेदवारी अद्याप तरी जाहीर केलेली नाही. साताऱ्याची जागा ही राष्ट्रवादीकडे असून,



ही आपल्या पक्षाला मिळाली पाहिजे, असा अजित पवार गटाचा ठाम दावा आहे. उदयनराजे यांनी आपल्या पक्षाकडून लढावे, अशी अजित पवारांची भूमिका आहे. उदयनराजे यांना अजितदादांच्या नेतृत्वाखाली काम करायचे नाही. कारण यापूर्वी उभयतांमध्ये वितुष्ट होते. साताऱ्याचा तिढा यातून कायम आहे. रत्नागिरी-सिंधुदुर्गमध्ये नारायण राणे यांनी लढण्याची मानसिकता केली आहे. त्यानुसार भाजप किंवा राणे समर्थकांनी तयारी सुरू केली असली तरी शिवसेना शिंदे गटाचे नेते व उद्योगमंत्री उदय सामंत हे माघार घेण्यास तयार नाहीत. सामंत यांना आपल्या भावाला उभे करायचे आहे. सामंत यांचे बंधू निवडून येऊ शकत नाहीत, असा भाजपचा सर्वेक्षणातील निष्कर्ष आहे. महायुतीत या जागेचा वादही अद्याप सुटलेला नाही.

महाविकास आघाडीत सांगली, भिवंडी आणि दक्षिण मध्य मुंबई या तीन मतदारसंघांवरून निर्माण झालेला तिढा कायम आहे. सांगलीची जागा कोणत्याही परिस्थितीत मिळालीच पाहिजे, असा काँग्रेस नेत्यांचा आग्रह असला तरी शिवसेना माघार घेण्यास तयार नाही. मैत्रीपूर्ण लढतीचा प्रस्ताव विश्वजित कदम व अन्य काँग्रेस नेत्यांनी मांडला असला तरी दिल्लीतील नेत्यांची त्याला अजून तरी मान्यता नाही. भिवंडीवरून काँग्रेस आणि राष्ट्रवादीतील तिढा सुटू शकलेला नाही. दक्षिण मध्य मुंबईची जागा मिळावी ही काँग्रेसची मागणी असली तरी शिवसेनेने सांगलीच्या जागेवरील दावा मागे घ्या मग बघू, अशी भूमिका घेतली आहे.

## शिक्षण दहावी पास, मात्र उभारले एमडी ड्रग्जचे २५० कोटींचे साम्राज्य

■ मुंबई : विशेष प्रतिनिधि

मुंबई पोलिसांच्या गुन्हे शाखेने सांगली येथील एमडी निर्मितीचा कारखाना उद्ध्वस्त करत कुर्ला, सांगली, सुरत या ठिकाणी कारवाई करत १० जणांना बेड्या ठोकल्या आहे. या कारवाईत पोलिसांनी २५२ कोटी रुपयांचा १२६ किलो एमडीसाठा जप्त केला आहे. टोळीचा म्होरक्या प्रवीण ऊर्फ नागेश रामचंद्र शिंदे (३४) केवळ दहावी पास असून त्याने उत्तर प्रदेशमध्ये चार वर्षे एमडी बनविण्याचे प्रशिक्षण घेऊन सांगलीत ड्रग्ज बनविण्याचा कारखाना थाटल्याचे गुन्हे शाखेच्या तपासात समोर आले आहे. कुर्ला येथे गुन्हे शाखेच्या कक्ष ७ च्या पथकाने वरिष्ठ निरीक्षक महेश तावडे यांच्या नेतृत्वाखाली परवीन बानो शेख (३३) या महिलेला ६४१ ग्रॅम एमडीसह अटक केली. १६ फेब्रुवारीला करण्यात आलेल्या कारवाईत १२ लाख २० हजार व २५ ग्रॅम सोन्याचे दागिने पोलिसांनी हस्तगत केले. पोलिस निरीक्षक आत्माजी सावंत यांनी तिची चौकशी केली असता मीरारोड येथील व्यक्तीकडून हे एमडी घेतल्याचे तिने सांगितले. त्यानुसार पोलिसांनी मीरारोड येथील एमडी विक्रेता साजीद शेख ऊर्फ डेबस (२५) याला उचलले.



त्याच्याकडून सहा कोटी किमतीचा तीन किलो एमडी व तीन लाख ६८ हजार रुपयांची रोकड असा मुद्देमाल मिळून आला. त्याच्या चौकशीत तो सुरत येथील दोघांना एमडी विकत असल्याचे समोर आले. मग त्यानुसार निरीक्षक शिंदे, उबाळे, सपोनि अमोल माळी, उपनिरीक्षक स्वप्निल काळे, रामदास कदम, शेलार व पथकाने सुरतेला जाऊन इजाजअली अन्सारी (२४) आणि आदिल बोहरा (२२) या दोघांना अटक केली.

आरोपींच्या चौकशीत ते सांगलीतून हा एमडी घेत असल्याचे समोर येताच, उपायुक्त दत्ता नलावडे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिसांनी सांगलीतले इरळे गाव गाठून द्राक्षाच्या शेताच्या आड लपून गुपचूप सुरू असलेला एमडीचा कारखाना उद्ध्वस्त केला. त्याठिकाणी १२२ किलो ५०० ग्रॅम वजनाचा एमडी, एमडी बनविण्यासाठी लागणारे साहित्य जप्त करून सहा जणांना अटक केली.

## गाव नकाशे नसल्याने मच्छीमारांचे अस्तित्व धोक्यात, पंचवीस वर्षापासून प्रतीक्षा

■ उरणः सचिन कदम

कोकण किनारपट्टीवर वास्तव्य करणाऱ्या मच्छीमार आणि इतर समाजांच्या गावाचे नकाशेच नसल्याने येथील नागरिकांचे अस्तित्व धोक्यात आले आहे. मागील पंचवीस वर्षांपासून याची ग्रामस्थांना प्रतीक्षा आहे.

राज्यातील सात किनारी जिल्ह्यांतील गावांचे गाव नकाशेच अस्तित्वात नसल्याने लाखो पारंपरिक मच्छीमारांची परवड झाली आहे. त्यामुळे पर्यावरणाचीही मोठ्या प्रमाणावर हानी झाली आहे. सिडकोने तर याचाच फायदा घेऊन हजारो हेक्टर जमिनी सीआरझेडचे उल्लंघन करून विविध प्रकल्प, कंपन्या व भांडवलदारांच्या घशात घालून अब्जावधींचा नफा कमावला असल्याचा गंभीर आरोप महाराष्ट्र स्मॉल स्केल ट्रॅडिशनल फिश वर्कर



संघटनेचे अध्यक्ष व पर्यावरणवादी नंदकुमार पवार यांनी केला आहे. मुंबई, ठाणे, पालघर, रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग आदी सात समुद्रकिनारे असलेले जिल्हे आहेत. या सातही जिल्ह्यांत मासेमारी करणाऱ्या गावांची संख्या मोठी आहे. पारंपरिक पद्धतीने पिढीजात मासेमारी करणाऱ्या या मच्छीमारांच्या समुद्र, खाडी आदी सागरी क्षेत्रांतील विविध किनाऱ्यांवर राखीव जागा आहेत. या राखीव जागांचा उपयोग स्थानिक मच्छीमार समाजाचा विकास व उन्नती व्हावी म्हणून मासळीची चढ-उतार करण्यासाठी मासेमारी जेट्टी, आईस फॅक्टरी, मासेमारी बोटींची डागडुजी, मच्छीमार जाळी, मासळी सुकविण्यासाठी करीत होते. पारंपरिक मासेमारी करणाऱ्या मच्छीमारांचे क्षेत्र अबाधित ठेवण्यासाठी, मच्छीमारांबरोबरच विविध सागरी जैवविविधतेचे संरक्षण व्हावे या मुख्य हेतूने १९९१ साली सीआरझेडचा कायदा अमलात आणण्यात आला आहे.

## पाकिस्तानच्या पंतप्रधानांनी अवलंबली 'मोदीनिती', देशाला आर्थिक संकटातून बाहेर काढण्यासाठी उचललं 'हे' पाऊल

■ मुंबईः सचिन कदम

सध्या आपल्या शेजारचा देश पाकिस्तान मोठ्या आर्थिक संकटात सापडला आहे. त्या ठिकाणी मोठ्या प्रमाणात महागाई वाढली आहे. अर्थव्यवस्था कोलमडल्याचं चित्र पाहायला मिळत आहे. दरम्यान, पाकिस्तानचे पंतप्रधान शेहबाज शरीफ या स्थितीतीन पाकिस्तानला बाहेर काढण्याचे प्रयत्न करत आहेत. देशाची आर्थिक स्थिती बदलण्याचे वचन त्यांनी पाकिस्तानातील जनतेला दिले आहे. यासाठी ते भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची निती अवलंबणार आहेत.

पाकिस्तानला आर्थिक संकटातून बाहेर काढण्यासाठी पंतप्रधान नवाज शरीफ प्रयत्न करत आहेत. या स्थितीतून बाहेर काढण्यासाठी त्यांनी आता नवीन पाऊल उचललं आहे. शरीफ यानी मंत्रीमंडळाच्या बैठकीत पंचवार्षिक योजना सामायिक करण्याचा निर्णय घेतला आहे. देशाच्या खर्चात कपात केली पाहिजे आणि देशाला स्वावलंबनाकडे नेलं पाहिजे असे मत शरीफ यांनी



व्यक्त केले आहे. त्यादृष्टीनं पाकिस्तान प्रयत्न करणार आहे. भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी देखील देशाला आत्मनिर्भर करण्याचा संकल्प केला होता. आज त्याचा संकल्पाने देशाची वाटचाल होत असल्याचे चित्र दिसत आहे. देशाच्या विकासाचा वेग असाच राहिला तर भारत लवकरच जगातील तिसरी मोठी आर्थव्यवस्था होण्याची शक्यता आहे. पाकिस्तानचे पंतप्रधान शेहबाज शरीफ यांनी देशाला आर्थिक संकटातून बाहेर काढण्यासाठी विविध प्रयत्न सुर केलेत. यातीलच एक प्रयत्न म्हणजे देशाची स्वावलंबनाकडे वाटचाल सुरु करणे हे आहे. यासाठी कृषी आणि माहिती तंत्रज्ञानासारख्या क्षेत्रात वाढ करण्याचा संकल्प पंतप्रधान नवाज शरीफ यांनी केला आहे. तसेच देशातून निर्यात वाढवण्यासाठी वाणिज्य मंत्रालय आवश्य ती पानले उचलणार असल्याची माहिती देखीळ शरीफ यांनी दिली आहे. या सर्व गोष्टीमुळं देशाची आस्थिक स्थिती सुधारण्यास मदत होणार आहे.

## पतीला ठार करण्यासाठी पत्नीने दिली ऑनलाईन 'सुपारी'

■ मुंबईः विशाल कारंडे

What's App, फेसबुक याप्रमाणेच सोशल मीडियाने सगळ्यांचं आयुष्य व्यापून टाकलं आहे. याचा उपयोग कुणी चांगल्या संदेशांसाठी करतं कुणी आणखी कशासाठी. अशीच एक



चक्रावून टाकणारी घटना समोर आली आहे. पत्नीने पतीला ठार करण्याची ऑनलाईन सुपारीच व्हॉट्स ॲपच्या माध्यमातून दिल्याची ही घटना आहे. व्हॉट्स ॲपच्या स्टेटसवर ५० हजारांचं इनाम जाहीर करत या महिलेने पतीला मारण्याची ऑनलाईन सुपारी दिली आहे. प्रेमाचं प्रतीक म्हणून जी वास्तू ओळखली जाते त्या ताज महाल असलेल्या आग्र्यातली ही घटना आहे. या ठिकाणी पत्नीने पतीला ठार करण्यासाठी ५० हजारांची ऑनलाईन सुपारीच दिली आहे. पत्नीचं व्हॉट्स ॲप स्टेटस पाहून पती घाबरला आणि त्याने तिच्याविरोधात तक्रार दाखल केली. पोलिसांनी मला वेळीच मदत करावी नाहीतर माझ्या जिवाला धोका आहे असं त्याने म्हटलं आहे. तसंच पत्नीच्या मित्राविरोधातही धमकावल्याचा आरोप केला आहे. या प्रकरणी पोलिसांनी या माणसाच्या पत्नीविरोधात गुन्हा दाखल केला आहे.

बाह पोलीस ठाण्याचे प्रभारी श्याम सिंह यांनी सांगितलं की आम्ही या प्रकरणी गुन्हा दाखल केला आहे. महिलेच्या पतीने पोलिसात तक्रार दाखल केली. या दोघांचं लग्न ९ जुलै २०२२ ला झालं. लग्नानंतर या दोघांमध्ये सातत्याने भांडणं होत होती. डिसेंबर २०२२ ला या माणसाची पत्नी माहेरी गेली.

## उदयनराजेंविरोधात पृथ्वीराज चव्हाण उतरणार मैदानात?

■ मुंबईः प्रथमेश चव्हाण

राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे विद्यमान खासदार श्रीनिवास पाटील यांनी निवडणूक लढवण्यास नकार दिल्यामुळे शरद पवारांसमोर मोठा पेच उभा राहिला आहे. भाजपकडून उदयनराजे भोसले यांना उमेदवारी दिली जाणार असून, त्यांच्याविरोधात ताकदीचा उमेदवार उतरवण्याचे आव्हान पवारांसमोर आहे. त्यादृष्टीने चाचपणी सुरू असून, माजी मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाणांना साताऱ्यातून उमेदवारी दिली जाऊ शकते, असे म्हटले जात आहे. श्रीनिवास पवार यांनी प्रकृतीच्या कारणामुळे लोकसभा निवडणूक लढवण्यास नकार दिला. त्यामुळे साताऱ्यातून शरद पवार कुणाला उमेदवारी देणार, हा प्रश्न चर्चिला जात आहे. त्यात रविवारी पक्षाचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांनी माजी मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण यांची भेट घेतली. श्रीनिवास पवार यांनी नकार दिल्यापासूनच पृथ्वीराज चव्हाण यांचे नाव चर्चेत होते. त्याला जयंत पाटील यांच्या भेटीने आणखी हवा मिळाली.



कराड येथील पृथ्वीराज चव्हाण यांची त्यांच्या निवासस्थानी जयंत पाटील भेट घेतली. सातारा लोकसभा मतदारसंघातून निवडणूक लढवावी, असा शरद पवारांचा मेसेज घेऊन पाटील चव्हाणांना भेटल्याचे राजकीय वर्तुळातून सांगितले जात आहे.

सातारा लोकसभा मतदारसंघात राष्ट्रवादीकडे तगडा उमेदवार नसल्याने काँग्रेसच्या कार्यकर्त्यांकडूनही पृथ्वीराज चव्हाण यांच्या उमेदवारीची मागणी केली जात आहे. पृथ्वीराज चव्हाण या मतदारसंघातून उभे राहिल्यास उदयनराजे भोसलेंविरोधात मोठं आव्हान निर्माण होऊ शकते, असा सूर स्थानिक पदाधिकाऱ्यांचा आहे. श्रीनिवास पवार यांच्या माघारीनंतर शशिकांत शिंदे, बाळासाहेब पाटील, जिल्हाध्यक्ष सुनील माने यांच्या नावांची चर्चा होती. पण, यापैकी कुणालाही तिकीट दिल्यास तितकी तगडी फाईट होण्याची शक्यता कमी आहे. त्यामुळेच पवारांकडून चांगल्या उमेदवाराची चाचपणी केली जात आहे. यात पृथ्वीराज चव्हाण यांचे नावे पुढे आहे.

## हरित पट्ट्याच्या मुळावर एमआयडीसी, २०० झाडांची कत्तल होणार, पर्यावरणवादी संस्थेची थेट मुख्यमंत्र्यांकडे तक्रार

■ नवी मुंबईः धनश्री सट्टा

आशियातील सर्वात मोठा औद्योगिक पट्टा म्हणून ओळखल्या जाणाऱ्या ठाणे-बेलापूर औद्योगिक नगरीच्या हरित पट्ट्यातील २०० झाडांचा बळी देण्यात येणार आहे. धक्कादायक बाब म्हणजे ज्या ठिकाणची २०० झाडे तोडणार आहेत, त्याच्या आसपास रासायनिक उत्पादन करणारे कारखाने आहेत. भूखंडासाठी हा बळी दिला जात असून हजारो झाडांची कत्तल केल्यावर आता शेवटच्या हरित पट्ट्याचा बळी जाणार असल्याने याबाबत पर्यावरणवादी संस्थेने थेट मुख्यमंत्र्यांकडे तक्रार केली आहे. एमआयडीसीच्या ठाणे-बेलापूर रसायन उद्योग पट्ट्यातील पावणे येथील एकमेव मोकळ्या



जागेतील तब्बल २०० झाडे प्रकल्पग्रस्तांना भूखंड तयार करण्यासाठी तोडण्यात येणार आहेत, असा दावा नॅटकनेक्ट फाउंडेशनचे संचालक बी एन कुमार यांनी केला आहे.

सरकारने प्रकल्पग्रस्तांना भूखंडवाटप करण्यास आमचा कोणताही आक्षेप नाही, मात्र हिरवा पट्टा जो रासायनिक कारखान्यांच्या परिसरात प्राणवायू देण्याचे महत्त्वाचे काम करतो अशा ठिकाणी निर्दयीपणे २०० झाडे तोडली जात आहेत, हे अत्यंत धक्कादायक आहे, असेही कुमार यांनी सांगितले. मुख्यमंत्र्यांना प्लॉट क्रमांक ७ या मोकळ्या भूखंडावरील झाडे वाचवण्यासाठी तातडीने हस्तक्षेप करण्याची विनंती करणारा ई-मेल पाठवला आहे.

## अनैसर्गिक कृत्यास विरोध केल्याने मुलाची हत्या, शीळ डायघर पोलिसांनी केली दोघांना अटक

■ ठाणेः तृप्ती गोरे

अनैसर्गिक कृत्य करण्यास विरोध केल्याच्या कारणावरून एका १२ वर्षीय मुलाची निर्घृणपणे हत्या करण्यात आल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. याप्रकरणी शीळ डायघर पोलिसांनी दोन जणांना अटक केली असून हे दोघे सख्खे भाऊ आहेत. ठाणे न्यायालयाने त्यांना २ एप्रिलपर्यंत पोलिस कोठडीत ठेवण्याचे आदेश दिले आहेत. या घटनेमुळे सर्वत्र हळहळ व्यक्त होत आहे. रमजान मोहम्मद कुददूस शेख (२०) आणि मोहम्मद आझाद कुददूस शेख (३०) अशी अटक करण्यात आलेल्या दोघांची नावे आहेत. हे दोघेही बिगारी काम करतात. हे दोघे ठाणे जिल्ह्यातील दहीसर येथील ठाकूरपाड्यातील अबीदभाई चाळीत राहतात. याच परिसरात हत्या झालेला १२ वर्षीय मुलगा राहत होता. तो २५ मार्च रोजी सायंकाळी ७ वाजता घराबाहेर खेळण्यास गेला होता. परंतु रात्री उशीर



होऊनही तो घरी परतलाच नव्हता. त्याच्या आईने दिलेल्या तक्रारीच्या आधारे शीळ डायघर पोलिसांनी अपहरणाचा गुन्हा नोंदवून तपास सुरू केला होता.

दरम्यान तळोजा पोलिसांना नवी मुंबई हद्दीतील आडीवली किरवली गावाजवळील ओढ्यातील पाण्याच्या डबक्यात हातपाय बांधलेल्या आणि डोक्यास जखमा असलेल्या अवस्थेत बेपत्ता मुलाचा मृतदेह आढळून आला होता. त्याच्या गळ्याभोवती कपडा गुंडालेला आढळून आला होता. हे प्रकरणी तळोजा पोलिसांनी शीळ डायघर पोलिसांकडे तपासासाठी वर्ग केले. शीळडायघरचे वरिष्ठ पोलिस निरिक्षक संदिपान शिंदे, पोलिस निरिक्षक (गुन्हे) सुनिल वरुडे यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलिस निरिक्षक महेश काळे, अब्दुल मलीक, अभिषेक नामपल्ले यांच्या पथकाने तपास करून काही संशयितांना ताब्यात घेतले. यामध्ये रमजान आणि मोहम्मद या दोघांचा समावेश होता.

## सुट्टी घेतल्यामुळे सेल्समनची चोरी उघड, १ कोटी ५ लाखांच्या दागिन्यांवर मारला डल्ला; नौपाडा पोलिसांनी केली सेल्समनला अटक

■ ठाणेः आकाश कांबळे

येथील नामांकित राजवंत ज्वेलर्स दुकानातून १ कोटी ५ लाख रुपयांचे सोन्याचे दागिने लंपास करणाऱ्या सेल्समनला नौपाडा पोलिसांनी मोठ्या शिताफिने अटक केली आहे. दारु पिण्यासाठी आणि मौजमजा करण्यासाठी पैसे कमी पडत असल्याने त्याने ही चोरी केल्याचे पोलिस तपासात समोर आले आहे. त्याने एक दिवसांची सुट्टी घेतल्यामुळे हा प्रकार उघडकीस आला असून या गुन्ह्यात आणखी कुणाचा सहभाग आहे का, याचा तपास पोलिस करीत आहेत.

राहुल जयंतीलाल मेहता असे अटक करण्यात आलेल्या सेल्समनचे नाव असून तो ठाण्यातील गावदेवी मैदानाजवळील अशोका हाईटस इमारतीत राहतो. तो ठाण्यातील डॉ. मुस रोड भागात असलेल्या राजवंत ज्वेलर्समध्ये सेल्समन म्हणून काम करीत होता. दुकानातील विक्रीकरिता दिलेले दागिन्यांचा दररोज त्याला हिशोब द्यावा लागत होता आणि तो त्याच्या लॉकरमध्ये ठेवत होता. मालक सुरेश पारसमल जैन यांचा त्याच्यावर विश्वास होता आणि यामुळेच त्याने दिलेला हिशोब योग्य असल्याचे ते मानत होते. परंतु ८ मार्च २०२३ रोजी राहुल हा कामावर आला नसल्यामुळे त्याचे काम दुसऱ्या सेल्समनकडे सोपविण्यात आले. त्यावेळी १ कोटी ५ लाख किंमतीचे सोन्याचे दागिने घेऊन राहुल फरार झाल्याचे मालकाच्या निदर्शनास आले. याप्रकरणी मालक सुरेश जैन यांनी दिलेल्या तक्रारीच्या आधारे नौपाडा पोलिसांनी गुन्हा दाखल



करून तपास सुरू केला. पोलीस आयुक्त आशुतोष डुंबरे, सह पोलीस आयुक्त डॉ. ज्ञानेश्वर चव्हाण, अप्पर पोलीस आयुक्त विनायक देशमुख, पोलीस उपायुक्त सुभाष बुरसे, सहाय्यक पोलीस आयुक्त प्रिया ढाकणे, वरिष्ठ पोलीस निरीक्षक अभय महाजन, पोलिस निरिक्षक (गुन्हे) शरद कुंभार यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलिस निरिक्षक मंगेश भांगे यांच्या पथकाने तपास करून राहुलला मिरारोड येथून अटक केली. पोलिसांची पथकाने राहुलच्या घरी जाऊन तसेच नातेवाईकांकडे चौकशी केली असता, तो ८ मार्चपासून कामावर जात नसल्याचे समोर आले. तसेच १५ मार्चपासून राहुल हा बेपत्ता असल्याची तक्रार त्याच्या पत्नीने नौपाडा पोलिस ठाण्यात दिली होती. यावरुन दुकानात केलेली चोरी उघड होईल या भितीने राहुल मोबाईल बंद करुन पसार झाल्याची बाब पोलिसांच्या निदर्शनास आली. तो मिरा रोड, मुंबई, इंदौर, गुजरात अशा वेगवेगळया ठिकाणी फिरत होता आणि पोलिसांच्या पथकाला गुंगारा देत होता.